नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

व्यं. रा. वनमाली
वसंत वऱ्हाडपांडे
सौ. सरस्वतीबाई सुभेदार
वसन्त निनावे
तु. ना. काटकर
बाबा मोहोड
रमेश वाबगावकर
भास्कर कविमंडन
गणेश पाठक
वैकुंठ ग. इंगळे
भ. प्र. मोहरीर
प्रभाकर माचवे
गो. रा. दोडके
आणि
संघवार्ता

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:

एप्रिल १९५४ किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

कर्मवीर दप्तरी स्मृति
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

युगवाणी

वर्ष ९ वें एप्रिल १९५४ अंक १ ला

संपादकीय

आभार

जुन्या संपादकांच्या नांवाने निघणारा हा शेवटचा अंक होय. यानंतर 'मे'पासून युगवाणीची धुरा संपादक म्हणून श्री. पु. य. देशपांडे आणि त्यांचें संपादकमंडळ सांभाळील. श्री. पु. य. देशपांडे व त्यांचें संपादकमंडळ यांचें आम्ही मनःपूर्वक स्वागत करतों व युगवाणीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी इच्छा प्रगट करतों.

संपादकीय जबाबदारी सोडतांना एकदोन गोष्टींचा उल्लेख करणें आम्हांस अत्यंत महत्वाचें वाटतें. त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे आम्हांस मिळालेलें संपादकमंडळाचें सहकार्य. श्री. ह. ना. नेने, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. गो. रा. दोडके, श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, प्रा. अ. ना. देशपांडे, सौ. इंदुमति शेवडे, सौ. उषाताई कोलते; श्री. त्रिं. गो. देशमुख आणि श्री. म. बा. देवघरे या सर्व मंडळींनी आम्हांला आपापल्या परीने सहकार्य देऊन उपकृत केलें आहे. विशेषतः श्री. ह. ना. नेने, प्रा. के. ज. पुरोहित आणि श्री. गो. रा. दोडके या मंडळीवर कार्याचा भार अधिक पडला तो त्यांनी आनंदाने उचलला ही गोष्टहि येथे नमूद करणें अत्यावश्यक आहे. पुन्हा एकदा मी माझ्या सर्व सहकाऱ्यांचें मनःपूर्वक आभार मानतों.

गेल्या वर्षांत युगवाणीने केलेली प्रगति निःपक्षपाती वाचकांना पटलेली आहेच; तथापि आम्हाला तिच्या विविध उणीवांची पूर्ण जाणीव आहे. दिवाळी व संमेलन असे दोन खास अंक किंवा एखाद्या महिन्यांतील अपवाद सोडल्यास तिच्या प्रसिद्धीचा नियमितपणा इत्यादि गोष्टी वाचकांच्या अनुभवास आल्या असल्या, तरी अजूनहि पुष्कळ दृष्टीने प्रगति व्हावयाची आहे. अशी प्रगति होईल याविषयी आम्हाला संशय नाही; पण त्यासाठी करावयाच्या अनेक प्रयत्नांपैकी एक महत्वाचा प्रयत्न लेखकांनी करावयाचा आहे. युगवाणीच्या परिसरांत लेखकांची वाण नाही, पण त्यांची कृपादृष्टि 'युगवाणी'ला अधिक लाभली पाहिजे. या लेखकांपैकी प्रत्येकाने एक लेख जर युगवाणीला वर्षाकाठीं देण्याचें ठरविलें तर युगवाणीचें स्वरूप लवकरच भरदार झालेलें वाचकांना दिसेल. यासाठी सर्व लेखकांना आम्ही या जबाबदारीची आठवण करून देऊन नम्र विनंती करतों की त्यांनी या वर्षात निदान एकेक लेख युगवाणीला द्यावा.

याच ठिकाणीं युगवाणीला येणाऱ्या कवितांच्या संख्येचाहि उल्लेख करणें अवश्य आहे. युगवाणीकडे येणाऱ्या कवितांची संख्या मोठी आहे. पण तींतील विविधतेचा अभाव मात्र जाणवतो. तेव्हा नव्या जुन्या कवींनी निरनिराळे विषय व शैली यांच्याकडे अधिक लक्ष द्यावें अशी आमची सूचना आहे.

जुन्या सभासदांना हा 'एप्रिल'चा अंक केवळ सवलत म्हणून पाठविला जात आहे. ज्यांची वर्गणी संपली असेल त्यांचें इकडे ध्यान आकर्षित करावें एवढाच हें कळविण्यांत आमचा हेतु आहे.

पुन्हा एकदा मी संपादक मंडळ, लेखक, कवि व युगवाणीचे मुद्रक श्री. पां. ना. बनहट्टी यांचे आभार मानतों व युगवाणीला सुयश चिंतितों.

*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. श्रीमंत पूर्णचंद्रराव ऊर्फ भय्यासाहेब बुटी

दिनांक ३०-३-१९५४ रोजीं दुपारीं १-२० वाजतां श्रीमंत भय्यासाहेब बुटी यांच्या निधनाची अत्यंद दुःखद वार्ता आमच्या कानीं आली. विदर्भ साहित्य संघाचें केंद्र नागपूर येथे स्थापन झाल्यापासून कै. श्रीमंत भय्यासाहेब बुटी मोठया आस्थेने जवळ जवळ प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहून उत्तेजन देत असत. विशेषतः 'विदर्भ साहित्य मंदिरा'चें काम सुरू झाल्यापासून मंदिररचनेचें काम कोठपर्यंत आलें याची वेळोवेळीं ते उत्सुकतेने चवकशी करीत. त्यांच्याच उदारतेमुळे व मदतीने 'विदर्भ साहित्य मंदिरां'तील 'बुटी दिवाणखाना' मूर्त स्वरूपास येण्याचें कार्य घडून आलें. थोडक्याच दिवसांत 'विदर्भ साहित्य मंदिरा'चें उद्घाटन व्हावयाचें आहे; त्या प्रसंगीं आमच्या या उदार नागरिकाची अनुपस्थिति आम्हांला जाणवल्यावाचून राहणार नाही. नागपुरांतील विविध संस्थांचा एक उदार आश्रयदाता व सहृदय नागरिक नाहीसा झाला याबद्दल कोणालाहि हळहळच वाटेल. परमेश्वर करो, व त्यांच्या आत्म्यास शांति लाभो !

पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,
संपादक

विदर्भ साहित्यसंघाच्या राजभाषा अधिनियम उपसमितीचें निवेदन

[वि. सा. संघाच्या राजभाषा अधिनियम उपसमितीचे आमंत्रक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पुढील निवेदन वि. सा. संघाचे अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळ यांना सादर केलें आहे. —संपादक]

राजभाषा अधिनियम उपसमितीच्या १९५२-५३ सालांतील कामकाजाचें प्रतिवृत्त 'युगवाणी'च्या १९५३ मे-जूनच्या अकांत प्रसिद्ध झालेल्या सरचिटणीसांच्या कार्यवृत्तांत थोडक्यांत देण्यांत आलेलें आहे. त्यानंतर झालेल्या कामकाजाची माहिती पुढे दिली आहे.

ता. १७ मार्च १९५३ रोजीं वि. सा. संघातर्फे सर्वपक्षीय शिष्टमंडळाने मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांची भेट घेऊन त्यांना राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती करण्यासंबंधींचें आपलें ता. १० मार्च १९५३ चें निवेदन सादर केलें. या निवेदनाला श्री. व्ही. जे. चनगोले, श्री. के. आर. पाटील, श्री. राम लांजेवार, श्री. ख. ना. तिरपुडे, आणि श्री. नरेंद्र तिडके यांनी विधानसभेच्या सचिवालयाकडे ता. ८ जानेवारी १९५३ रोजीं पाठविलेलें दुरुस्ती–विधेयकहि जोडलेलें होतें.

मुख्य मंत्र्यांनी शिष्टमंडळाचें म्हणणें ऐकून घेऊन निवेदनांत केलेल्या सूचना आणि दुरुस्ती–विधेयक या दोहोंचा विचार अगत्यपूर्वक करण्याचें आश्वासन दिलें.

राजभाषा अधिनियमाबावत वि. सा. संघानें मध्यप्रदेश सरकारला सादर केलेलें हें निवेदन नंतर अनेक प्रसिद्ध व्यक्तींकडे राजभाषा अधिनियम उपसमितीचे आमंत्रक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पाठविलें. हें निवेदन मिळाल्याची पोंच पुढील व्यक्तींकडून आली आहे:—संसदेचे अध्यक्ष श्री. दादासाहेब मावळणकर, कांग्रेसचे अध्यक्ष आणि प्रधानमंत्री पं. नेहरू, श्री. शंकरराव देव, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. चिं. द्वा. देशमुख, म. म. डॉ. पां. वा. काणे, आचार्य स. ज. भागवत, सेनापति पां. म. बापट, मुंबई प्रादेशिक कांग्रेसचे अध्यक्ष श्री. स. का. पाटील, डॉ. बाबासाहेब जयकर, रँ. डॉ. र. पु. परांजपे, बॅ. रामराव देशमुख, प्रो. कृ. पां. कुळकर्णी, श्री. सीताबाई परमानंद, सौ. इंदिराबाई मायदेव, सौ. मालतीबाई वेडेकर, विदर्भ प्रादेशिक कांग्रेसचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव खेडकर, महाराष्ट्र प्रादेशिक कांग्रेसचे अध्यक्ष श्री. देवकीनंदन नारायण, श्री. शंकरराव मोरे, श्री. त्र्यं. र. देवगिरीकर, डॉ. वा. शि. बार्लिंगे, श्री. दि. के. बेडेकर,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. श्री. अ. डांगे, श्री. श्रीकृष्णदास जाजु, प्रा. चितामण विनायक जोशी, श्री लालजी पेंडसे, श्री. शं. रा. शेंडे, श्री. ग. ह. पाध्ये इ०

ता. २९ जून रोजीं मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांना पत्र पाठवून त्यांत ता. १७ मार्च १९५३ रोजीं जें शिष्टमंडळ त्यांना भेटलें होतें, त्याच्याशीं झालेल्या वाटाघाटींत मराठीला हिंदीच्या बरोबरीने समानतेचे स्थान देण्यासंबंधी जें आश्वासन त्यांनी दिलें होतें त्याची आठवण त्यांना करून देण्यांत आली व राजभाषा अधिनियमाची ता. १५ आगस्ट १९५३ रोजीं अंमलबजावणी करण्यापूर्वी समानता आणण्याच्या दृष्टीने सरकार कोणते उपाय योजीत आहे, हें कळविण्याचीहि विनंती करण्यांत आली.

त्याच दिवशी विदर्भ प्रदेश कांग्रेसचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव खेडकर यांनी विदर्भ साहित्यसंघाला भेट दिली. तेव्हा त्यांच्याशींहि या प्रश्नासंबंधी चर्चा करण्यांत आली; व त्यांनी याबाबत शक्य ते प्रयत्न करण्याचें आश्वासन दिलें.

ता. ५ ऑगस्ट रोजीं मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्याकडे श्री. पु. य. देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ए. श्री. पटवर्धन आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचें शिष्टमंडळ पुन्हा गेलें. मुख्य मंत्री पं. शुक्ल यांनी त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें; व दोन राजभाषांत सर्व राज्यकारभार चालविण्याबाबत विदर्भ साहित्य संघाच्या सूचनांप्रमाणें वागावयाचें ठरविल्यास त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या व्यावहारिक अडचणी त्यांच्यासमोर ठेवल्या. शिष्टमंडळाने त्यांना स्वित्झर्लंड व दक्षिण आफ्रिका या दोन देशांतील अनेक राजभाषांच्या व्यवहाराचा दाखला दिला. तेव्हा त्यांनी याबाबत अधिकृत माहिती आपल्याला पुरविण्याची मागणी केली.

मुख्य मंत्र्यांच्या या सूचनेनुसार श्री. माडखोलकर यांनी स्वित्झर्लंडाची भारतांतील दिल्ली येथील वकालत व दक्षिण आफ्रिकेचे माजी हायकमिश्नर बॅ. रामराव देशमुख, घटनापंडित प्रा घ. रा. गाडगीळ प्रभृतींकडून माहिती मागविली. संसदेच्या सदस्य सौ. अनसूयाबाई काळे यांनाहि त्यांनी पत्र लिहून माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली. स्विस वकालतीकडून आलेली माहिती त्यांनी मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्याकडे ता. २६-८-५३ रोजीं पाठविली. त्यांच्याकडे पाठविलेल्या या पत्रव्यवहाराच्या प्रति विकासमंत्री श्री. रा. कृ. पाटील, शिक्षणमंत्री श्री. पु. का. देशमुख, अर्थमंत्री आणि मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री ब्रिजलाल बियाणी, अन्नमंत्री श्री. दीनदयाल गुप्त आणि आरोग्यमंत्री श्री. कन्नमवार यांच्याकडेहि पाठविण्यांत आल्या. दक्षिण आफ्रिकेंतील राजभाषांच्या अंमलबजावणीसंबंधी बॅ. रामराव देशमुख आणि प्रो. घ. रा. गाडगीळ यांच्याकडून आलेली माहितीहि मुख्य मंत्र्यांकडे पाठविण्यांत आली.

दिल्ली येथील स्विस वकालतीकडून व बॅ. रामराव देशमुख आणि प्रा. ध. रा. गाडगीळ यांच्याकडून आलेलीं पत्रें आणि लेख 'नागपूर टाइम्स' 'महाराष्ट्र' आणि 'तरुण भारत' या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आलीं.

मध्यंतरीं ता. १ सप्टेंबर १९५३ रोजीं राज्यभाषा अधिनियम दुरुस्ती न होतांच अंमलांत आला.

ता. १६ सप्टेंबर रोजीं स्विस वकालतीला पुन्हा पत्र पाठवून श्री. माडखोलकर यांनी आणखी माहिती आणि कांही मुद्यांचें स्पष्टीकरण मागितलें.

ता. २१ सप्टेंबर रोजीं स्विस वकालतीकडून जें पत्र आलें, त्यांत त्यांनी असें स्पष्ट म्हटलें आहे की—

(१) फेडरल असेंब्लींत एखादें बिल मांडतांना मंत्री आपल्या मातृभाषेंतून तें मांडतो. मग ती भाषा जर्मन, फ्रेंच व इटालियन यांपैकी कोणतीहि असो.

(२) कोणतेंहि बिल असेंब्लींत तीनहि राजभाषांत एकदम सादर केलें जातें.

(३) बिलाचा अधिकृत मसुदा तीनहि भाषांत असतो.

या पत्राच्या प्रतीहि मुख्य मंत्री व इतर मराठी मंत्री यांच्याकडे पाठविण्यांत आल्या. इतकें अधिकृत साहित्य मिळाल्यानंतर तरी मध्यप्रदेश सरकार स्वतः राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती करणारें बिल आणून मराठी भाषेवरील अन्याय दूर करील, अशी अपेक्षा होती, व विधानसभेचे सदस्य श्री. तिरपुडे आणि श्री.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काशीराव पाटील यांनी दुरुस्ती बिलाची सूचनाहि दिली होती. पण हें दुरुस्ती बिल विचारासाठी येणेंच कठीण होऊन बसलें आहे.

ता. ४ ऑक्टोबर रोजीं भरलेल्या विदर्भ साहित्य-संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सभेने मध्यप्रदेश विधान-सभेंतील मराठी सदस्यांना वि. सा. संघांत बोलाव-ण्यांत यावें आणि त्यांच्याशीं उहापोह करावा, असा ठराव केला. श्री. माडखोलकर आणि श्री. पटवर्धन यांनी या ठरावानुसार प्रयत्न केला, पण विधान-सभेची बैठक दररोज रात्रीं ७ वाजेपर्यंत या वेळीं भरत असल्यामुळें अशी सभा बोलावणें शक्य झालें नाही.

ता. १४ ऑक्टोबर रोजीं मुख्य मंत्री पं. रवि-शंकर शुक्ल यांना पुन्हा पत्र लिहून स्विस वकालती-कडून आलेल्या अधिकृत माहितीनुसार राजभाषा अधिनियमांतील सेक्शन ४ बदलण्याविषयी विनंती करण्यांत आली; व त्या पत्राच्या प्रती श्री. रा. कृ. पाटील. श्री. पु. का. देशमुख, श्री. बियाणी प्रभृतींना पाठविण्यांत आल्या. या पत्रांची पोच मिळाली. पण, अधिनियमांत दुरुस्ती करण्याच्या बाबतींत सरकारकडून काय करण्यांत येणार आहे, याचें उत्तर मात्र मिळालें नाही.

मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनी प्रथम कांग्रेस पक्षाच्या सभेत कांग्रेस सदस्यांना राजभाषा अधिनियमांत दुरुस्ती करण्याचें आश्वासन दिलें; व त्यानंतर वि. सा. संघाचें शिष्टमंडळ दोनदां भेटलें; तेव्हाहि मराठी भाषेवरील अन्याय दूर करण्याच्या दृष्टीनें कायदा दुरुस्त करण्याचें आश्वासन त्यांनी दिलें. इतर राष्ट्रांतील अनेक राजभाषांच्या व्यवहारासंबंधी दाखले त्यांनी मागितले, तेहि त्यांना समितीकडून पुरविण्यांत आले.

त्याचप्रमाणे समितीकडून आतापर्यंत विधान-सभेपुढे दुरुस्ती-विधेयक आणण्याच्या बाबतींतहि बारा वेळा प्रयत्न झाला. पण मुख्य मंत्र्याशीं शिष्टाई करून आणि विधानसभेकडे दुरुस्ती-विधेयकें पाठवून राज-भाषा अधिनियमांत सुधारणा घडवून आणण्यासाठी जे हे प्रयत्न समितीने गेलीं दोन वर्षे चालविले आहेत, त्यांत यत्किंचितहि यश समितीला अद्याप आलेलें नाही हें मोठ्या खेदाने नमूद करणें प्राप्त आहे.

सभासदांना व प्रचारकांना सूचना

(१) विदर्भ साहित्य संघाचें नवें वर्ष १ एप्रिल १९५४ पासून सुरू झालें आहे.

(२) जुन्या सभासदांची वार्षिक वर्गणी ३१ मार्च १९५४ रोजीं संपली आहे तेव्हा सभा-सदांनी नवीन वर्षाची सभासदत्वाची आपली वर्गणी त्वरित पाठविण्याची कृपा करावी.

(३) जुन्या सभासदांनी नवीन वर्षाची (१९५४-५५ सालासाठी) सभासदत्वाची वर्गणी भरल्याशिवाय त्यांना पुढील अंक मिळणार नाही. म्हणून तसें नम्रपणें सूचित केलें जात आहे.

(४) जे सभासद होतील त्यांनी घटना नियम ८ प्रमाणे कार्यालयीन पावतीच्या मागे स्वाक्षरी केलीच पाहिजे. त्याशिवाय त्यांना सभासदत्वाचा अधिकार प्राप्त होणार नाही. प्रचारकांनी हा नियम सभासद बनवितांना लक्षांत असूं द्यावा अशी विनंती आहे.

(५) जे प्रचारक सभासद बनवितील त्यांनी त्या सभासदांची वर्गणी व कार्यालयीन पावत्या ताबडतोब केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवाव्या. केवळ सभासदांचीं नांवें व वर्गणी पाठविली पण कार्या-लयीन पावत्या पाठविल्या नाहीत, तर तीं नांवें सभासद म्हणून नोंदणी-वहींत नमूद केलीं जाणार नाहीत व मग कार्यालयावर कसलीहि ज़बाबदारी राहणार नाही.

तरी सभासदांनी व प्रचारकांनी या कार्यांत सहकार्य द्यावें, अशी नम्र विनंती आहे.

केन्द्रीय कार्यालय, दि. ३१ मार्च १९५४
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रुतिका

देवाच्या द्वारीं

प्रा. व्यं. रा. वनमाली, नागपूर

(वैकुंठपूर; प्राणहितेचें तीर; सकाळ)

(१)

शास्त्रीबुवा:—काय रे चितू, आज लवकरसा आलास स्नानाला ?

चिंतामण:—होय, शास्त्रीबुवा, आज नरक-चतुर्दशी नाही का ? पण तुम्हाला उशीर कसा झाला ?

शास्त्रीबुवा—रस्त्यांत येतांना तो महाराचा पोर, पांड्या, भेटला.

चिंतामण—कोण पांडुरंग ! माझ्याबरोबर शिकत होता तो ? बारा वर्षांपूर्वी नाहीसा झाला तो ?

शास्त्रीबुवा:—तोच असेल ! विचारत होता तुझ्याविषयीं ! म्हणतो कसा, चिंतामण खरे आतां कुठे आहे ? हें बघ चितू, तूं ब्राह्मणाला मुलगा, त्या महारड्याशीं कसची रे मैत्री तुझी !

चिंतामण—(आनंदानें) पण तो आला केव्हा ? आणि आहे कुठे ?

शास्त्रीबुवा—मी त्याला हाकललें तिकडे दूर ! म्हटलें, ही जागा ब्रह्मवृंदाच्या स्नानासाठी आहे, इथें अस्पृश्य नकोत !

चिंतामण—काय हें शास्त्रीबुवा ?

शास्त्रीबुवा—तो असेंच कांही म्हणत होता. त्याला वाटेला लावला एकदाचा आणि आलों बघ. हा विटाळ धुवून टाकूं दे लवकर. दिवाळीच्या दिवशीं केवढा हा अपशकुन !

चिंतामण—आतां जग बदललें आहे, शास्त्रीबुवा ! उद्या तुम्ही या वाऱ्यावर, या आकाशावर मिरासदारी सांगाल. म्हणाल हा वारा ब्राह्मणांचा, हा सूर्य आमचा.

शास्त्रीबुवा—पुण्याला त्या आगरकरांच्या शाळेंत शिकल्यापासून तुला शिंगें फुटलीं आहेत. तुझे वडील महामहोपाध्याय शंकरशास्त्री केवढे वैय्याकरणी आणि व्युत्पन्न आणि तूं ! त्यांना स्वर्गांत काय वाटत असेल ? जाऊं दे आता ! तुमची पिढी ही अशीच धर्मभ्रष्ट !

(दुरून आवाज ऐकूं येतो.)

हतोऽवा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥

शास्त्रीबुवा—तो बघ तोच चांडाळ. भगवंतानें सांगितलेल्या गीतेचा उच्चार करतो आहे हा अस्पृश्य ! संस्कृत ही देवांची भाषा—

(पुन्हा आवाज ऐकूं येतो.)

गोड तुझें रूप, गोड तुझें नाम । देईं मज प्रेम, सर्वकाळ ॥

शास्त्रीबुवा—ऐकवत नाही मला, नाही ऐकवत हा देवांचा अपमान.

(पाण्यांत उतरतो.)

चिंतामण—किती सुंदर म्हणतो आहे, शास्त्रीबुवा ! (जोरानें हाक मारतो) पांडुरंग, अरे पांडुरंग. अरे मी चितू हा इथें आहे मी ! थांब, मीच आलों. (पळत जातो.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२)

चिंतामण-अरे गृहस्था, तूं आलास केव्हा ? मला भेटला नाहीस तो ? मला विसरलास कां काय ?

पांडुरंग-नाही रे ? म्हटलें आधी या पवित्र जलांत स्नान करावें आणि मग....

चिंतामण-(मध्येच) पण तूं इतके दिवस होतास कुठे ? तुझ्या वडिलांना मी मधूनमधून विचारत असें. पण ते म्हणावयाचे मला माहीत नाही आणि आता आलास कसा ?

पांडुरंग-चल, जातां जातां सांगतों. पण हें बघ. हा माझ्या खांद्यावर हा ठेवला आहेस ना, तो काढून घे. स्नान करून परत जातांना वैकुंठपुरच्या ब्राम्हणांनी तुला अशा सलगीनें माझ्याशीं वागतांना पाहिलें तर–

चिंतामण-(त्याचा हात हातांत घेत) बरें बरें, चल आता माझ्या घरीं. तुला बघून मला खूप आनंद झाला आहे. (थोडचा वेळाने) पण तूं होतास कोठें बारा वर्षें ?

पांडुरंग-विसरलास तूं ? नाही तुला आठवत ? बारा वर्षांपूर्वी विठ्ठलाच्या मंदिरांत—

(२ अ)

शास्त्रीबुवा-कारे महाराच्या पोरा, तूं या हिंदूंच्या देवळांत आलास कसा ?

पांडुरंग-विठ्ठलरखुमाईचें दर्शन घ्यायला !

शास्त्रीबुवा-तूं अस्पृश्याचा कारटा या ब्राम्हणांच्या मंदिरांत. चल, नीघ बाहेर.

पांडुरंग- मला आरती ऐकायची आहे. मला प्रसाद खायचा आहे.

शास्त्रीबुवा-तुला महाराला देवाचा प्रसाद ! तो फक्त पवित्र ब्राम्हणांचा वारसा आहे. ज्यांनी वेदांचें पठण केलें आहे, ज्यांना संस्कृत ये तें त्यांचीच ही मिरासदारी आहे. तूं आधी बाहेर हो, हो बाहेर.

पांडुरंग-मी जाणार नाही. आंत जाऊन मला मूर्ति बघायची आहे.

शास्त्रीबुवा-नाही जाणार? (पांडुरंगाच्या तोंडांत मारतो.) चल नीघ जातोस कां नाही? (पुन्हा मारतो.) डोळ्यांतून पाणी तरी बेतंय का या महारड्याच्या ? (पुन्हा मारतो.) शुंभ, बेरड, थटिंगण ! उभा आहे दगडासारखा. (फाड फाड दोन्ही गालांत मारतो.) काय मस्तवाल आहे हा चिमुरडा. (मारामुळे पांडुरंग खाली पडतो.)

(३)

चिंतामण-तेव्हा तुझ्या डोक्याला जखम झाली होती. कुठे आहे ती ?

पांडुरंग-(प्रश्नाकडे दुर्लक्ष करून) तेव्हा गाव सोडून आईबापांना न सांगतांच मी वाईला पळून गेलों. एका गुरूकडे अभ्यास केला. संस्कृत शिकलों. ह्या बारा वर्षांत कष्ट केले, जमिनीवर निजलों. कांबळ नाही, गोड घास माहीत नाही. (स्तब्धता) व आता–

चिंतामण-आता काय ?

पांडुरंग-बारा वर्षांपूर्वी केलेला निश्चय मी उद्या पार पाडणार !

चिंतामण-निश्चय ? कसचा निश्चय ?

पांडुरंग-बारा वर्षांपूर्वी केलेला निश्चय मी उद्या पार पाडणार. उद्या संध्याकाळीं लक्ष्मीपूजनाच्या वेळीं मी विठ्ठल मंदिरांत जाणार, प्रसाद घेणार व मूर्ति बघणार !

मायबाप सखा बंधु । विठ्ठल सावळा ॥
उभा विटेवरी । पाहीन मी डोळा ॥१॥
येवो मज मरण । मला नाही भेव ॥
तोचि माझा स्वर्ग । पांडुरंगा ॥२॥

चिंतामण-पण शास्त्रीबुवांना हें माहीत आहे का ?

पांडुरंग—हो आत्ताच त्यांची भेट झाली नदीवर जातांना.

चिंतामण-आता चल माझ्याकडे व माझ्याबरोबर जेव; ताईला बाजरीची खमंग भाकर करावयाला सांगतों ! जेवतांना आणखी तुझ्या गंमती सांग. विद्या संपादन करतांना तुला जो त्रास झाला तो सांग ! गाव बघितलास का ?

पांडुरंग—कुठे ? काल संध्याकाळीं तर आलों.

चिंतामण—मग आज संध्याकाळीं आपण गावांत फिरून येऊं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(३ अ)

(वैकुंठपूरचा मुख्य रस्ता संध्याकाळ)

एक जण—ताजा " दीनबंधु ". विठ्ठलमंदिरांत सत्याग्रह ! पांडुरंग महाराजांचा निश्चय ! ताजा 'दीनबंधु'. किमत एक आणा.

दुसरा—ताजा अंक. 'ब्रह्मशक्ति' ब्रह्मवृंदाचा निर्धार ! ' ब्रह्मशक्ति ', किमत अर्धा आणा.

पांडुरंग—हें कुणाचें घर रे, नवीन दिसतंय ?

चितामण—एका नायकिणीचा वाडा आहे हा ! ती बघ वर गच्चीवर आहे. विठ्ठलाच्या दर्शनाला ती आता जाईलच, तिला बघायला काय पण गर्दी असते लोकांची !

पांडुरंग—केवढी रोषनाई दिवाळीची ही तिच्या वाड्यावर ! आणि डाव्या हाताला हें कुणाचें गायन चाललें आहे वाचनालयांत ?

चितामण—चल वघूं तर. हे तर वैकुंठपूरचे प्रसिद्ध कवि " सिंहप्रताप ". ऐकूं या-

(३ ब)

सिंहप्रताप—

एक तुतारी द्या मज आणुनि।
फुंकिन मी जी स्वप्राणाने
भेदुनी टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने
अशी तुतारी द्या मजला कुणि ॥१॥
पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती
संप्रति दानव फार माजती
देवावर झेंडा मिरविती
देवांच्या मदतीस चला तर ॥२॥

पांडुरंग—पुरे, चल आता नदीच्या कांठीं ! त्या ब्राह्मण पुढाऱ्याचें भाषण मला ऐकावयाचें आहे.

चितामण—चल, मीहि ऐकलें नाही त्याला बरेच दिवसांत.

(३ क)

ब्राह्मण पुढारी—देशाची उन्नति करायची म्हणजे बहुजन समाजाचा उद्धार करायला पाहिजे. गरिबांचा छळ होतो, त्यांच्यावर अन्याय होतात, त्यांना कुत्र्याहूनहि वाईट वागवण्यांत येतें. तुकाराम महाराज म्हणतात, 'जे कां रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुलें.'

एक आवाज—काय हो सोमण वकील, तुमच्या घरीं जो कुणबी गडी आहे त्याला किती महिन्यांपासून तुम्ही पगार दिला नाही ? (हंशा)

पांडुरंग—काय रे सख्या, तूं इकडे कुठे ?

सख्या—तुम्ही आलांत असें कळलें म्हणून घरीं गेलों होतों. आईनें तुम्हाला वोलावलें आहे घुगऱ्या खायला !

पांडुरंग—उद्या सकाळीं येईन. जा तूं आता (सख्या जातो.)

चितामण—कोण रे हा, पांडुरंग ? केवढा सुंदर आहे ! तुमच्या जातींत इतकें सौंदर्य बघितलें नव्हतें मी.

पांडुरंग—बहुजन समाजाचा उद्धार आहे तो

चितामण—(खाली बघत) असें ! हें बघ आपण तुझ्या घराजवळ आलों. आणि काय रे हें ?

पांडुरंग—काय रे बा ?

चितामण—आज दिवाळी ना ? तुळशीसमोर एकहि दिवा नाही ! सारा अंधार ! सबंध गावांत तुझेंच एकटें घर दिसतें जिथे दिवा नाही दिवाळीचा.

(४)

(दशरथची झोपडी : दारांत कौसल्या)

पांडुरंग—मा, बाबा, बघा चितामण आला आहे.

कौसल्या—अरे ऊठ, तूं कशाला माझ्या पाया पडतोस, तूं कोण, आम्ही कोण ?

चितामण—प्रेमळ आईला कुठे जात असते का, ती सगळीकडे सारखीच, मला तुमचा आशीर्वाद द्या.

दशरथ—चितू, तूं शाळेंतला मास्तर. तुझी बहीण लग्नाची. तूं माझ्या पोराचा दोस्त म्हणून तुला लोक त्रास देतील. बघ, एक म्हाताऱ्याचं; त्याला कशाला जेवायला बोलावलेंस तुझ्या घरीं ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चिंतामण—पण दशरथबाबा, तुम्ही दिवनाली नाही लावल्यात, दिवाळी नाही कां करावयाची, पांडुरंग बारा वर्षांनी परत आला.

दशरथ—अरे काय सांगूं पोरा तुला, हा पांड्या बारा वर्षांपूर्वी घर सोडून गेला तेव्हांपासून घरांतला दिवाच गेला. दसरा नाही, दिवाळी नाही; काल हा आला तेव्हा घरधनीण तुळशीसमोर दिवा ठेवायला गेली, तर पांडू कसा म्हणतो—

पांडुरंग—नाही, दिवा नाही लावायचा, मी विठ्ठलाचा प्रसाद खाईन त्या दिवशींच गोड खाईन व विठ्ठलाचा पिवळा पीतांबर जवळून पाहीन त्या दिवशींच हा काळा सदरा व ही काळी टोपी काढून ठेवीन. तोंपर्यंत घरांत दिवा नाही, दिवाळी नाही, खीर नाही, कांही नाही! घरांत कोणी मेलें तर आपण गोड खातों का? दिवे लावतों का? (स्तब्धता) मी मेलोंच असें तूं समज. (दीर्घ शांतता)

दशरथ—माझा पोर इतक्या दिवसांनी आला. पण माझ्या झोपडींत अंधारच. या पोराचा हट्ट बघा, आता उद्या विठ्ठलाच्या देवळांत जाऊन प्रसाद घेईन, दर्शन घेईन म्हणतो, नाहीतर नाहीतर—(हुंदका दावतो.)

कौसल्या—पोराला कांही सांग चितू, इतक्या दिवसांनी आला व आता——(डोळ्याला पदर लावते.) चितू—

चिंतामण—दिवाळीच्या दिवशीं कसचें हें रडणें.

पांडुरंग—चल चितू, तुझी वहीण वाट बघत असेल.

(रस्ता : शास्त्रीबुवाच्या घरासमोर)

चिंतामण—शास्त्रीबुवाच्या घरांत बरीच मंडळी दिसते ना, आहे काय गडबड? आणि हा त्यांचा मुलगा इतके उंची कपडे घालून चालला आहे कुठे? (पुढे होऊन) काय गदाधर, कुठे निघालास इतक्या थाटांत, मुलगी पहावयाला?

गदाधर—हळू बोल चित्या, घरांत चालली आहे ब्रम्हवृंदाची सभा. वडील आहेत गर्क वादविवादांत.

चिंतामण-आणि तूं? तुला नाही का ब्रम्हशक्तीची उपासना करावयाची?

गदाधर—सारजा नायकिणीच्या वाड्यांत गाण्याचा जलसा आहे म्हटलं!

चिंतामण—अवश्य अवश्य, रसिक ब्राम्हणांचा हक्कच आहे तो!

गदाधर—बरें बरें नमस्कार!

चिंतामण—यावें महाराज!

(६)

(विठ्ठलाचें मंदिर, संध्याकाळ, देवाच्या दारीं गर्दी)

शास्त्रीबुवा—(आंत शिरत) काय रे खंडोबा, नीट व्यवस्था केलीस ना?

खंडोबा—व्हय जी महाराज, साथीदार आंत लपून बसल्याती.

संपादक १—नमस्कार "दीनबंधू"

संपादक २—नमस्कार "ब्रम्हशक्ति," देवाच्या दारीं तरी आपण एकमेकांना भेटलों हें भाग्यच म्हणावयाचें चला. चला आंत.

गदाधर—(हळूच) काय सारजे, मग काय उत्तर आहे तुझं. तूं म्हणशील तेवढे पैसे घे, पण तुझ्याजवळ एक रात्रभर—

सारजा—माझी जात माहीत आहे कां तुम्हाला? मी मूळची चांडाळकन्या आहे.

गदाधर—असेनास, तारुण्याचा व जातीचा काय संबंध?

सारजा—पण मी एकदा नाही म्हटलें तें नेहमीकरतां.

गदाधर—बघ, नीट विचार कर. मी कोण आहे सांगू? ऐक. वैकुंठपूरच्या विठ्ठलमंदिराच्या मुख्य पूजाऱ्याचा हा आवडता एकुलता एक मुलगा आहे. त्यानें मागितलें व त्याला मिळालें नाही असें आजपर्यंत जगांत घडलें नाही.

पांडुरंग—अरे तूं कशाला आलास चिंतामण?

चिंतामण—काय पण तुझा प्रश्न? चल, चल, आंत चल रे सख्या, तुमच्या दोघांचे हात धरून पुढे होऊं या. तूं इकडे ये, पांडुरंग उजवीकडे व तूं सख्या माझ्या डाव्या हाताला ये, चला आरती सुरू झाली.

[पुढील मजकूर पान २३ वर पहा.]

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

कांही कविता

सागराचें मनोगत

उभारूनि बाहू सहस्रावधी
वृद्धालिंगना जाहलों आतुर
सख्या शीतचंद्रा ! नको रे छळूं
क्षणीं शांतवी तृप्त हें अंतर !

न तूं मत्प्रिया वा नसे आत्मज
खुळ्या या कवींच्या असे कल्पना
–तरंगावली जोंवि पृष्ठावरी
क्षणैकस्थिता ! –सत्य अत्यल्प ना !

स्वयंभू असे तूं जगन्मित्र रे !
न विस्तारले बाहु भोगास्तव
मला ज्ञात; आयुष्य माझें असें
अहोरात्र सेवावया मानव !

परी अंतरीं अग्नि जाळीतसे
युगामागुनीया युगें लोटलीं
न कांही रुचे वा सुचे मानसा
जिवाची अती होतसे काहिली !

कुणाला कथूं जीविंच्या यातना
करूं अंतराला कुठे मोकळें ?
कळेना ! स्थिती होय वेड्यापरी
रडे ओरडे चित्त तापामुळे

कधी वाटतें मारुनीया मिठी
कशाला तरी घट्ट घ्यावें उरीं
जिवा पेटत्या द्यावया आर्द्रता
घडे आगळें मात्र कांही तरी !

विहारास नौकेंत ये बैसुनी
प्रिया प्रेयसी युग्म विश्वासुनी
गुजें गोड गुंफीत भावी मनीं
परी ध्वंसुनी जाय आलिंगनीं !

किती श्वापदें मानवी जीवनें
वृद्धालिंगनीं हाय ! झालीं चुरा
शिव्याशाप आत्मे तयांचे वदे
सदा ऐकितां जीव हो घाबरा !

न हेतू मनीं दुष्ट ! अंगार ही
जळे अंतरीं तोच या कारण
अनर्थांमुळे अर्थ ना जीवनीं
कलंकी गमे आयु ! चित्तीं रण !

प्रमादांतुनी वांचवी तूं अता
त्वरेनें सुधा अंतरीं सिंचुनी
असे सिद्ध सेवावया मानवा–
भुकेल्या मनें मी कधीपासुनी !

विलंबास कां ? व्यर्थ चंद्रा अता
वदे–काय शंका कुशंका तुला ?
तुझ्या चंदनी गोड आलिंगनीं
विझूं दे हृदीं अग्नि संतापला !

उभारूनि बाहू सहस्रावधी
दृढालिंगनीं जाहलों उत्सुक
सख्या शीत चंद्रा ! नको रे छळूं
मला एकला तूंच संरक्षक

—वसंत वऱ्हाडपांडे

स्वर्ग

माझ्या पुत्राचं तान्हुलं, सदा हासे चिमुकलं
तनयाचा तु तनय, सौख्य सागर मदीय.
रूप साजीरे गोजीरे, बघतांना भान हरे
लाडक्यासी कडे घेते, स्वर्ग भासे येथे येथे.

—सौ. सरस्वतीबाई सुभेदार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्तब्ध बधिर शून्यता

माध्यान्हींच्या उन्हागत
स्तब्ध बधिर शून्यता
आळविते माझ्या मनीं
अनामिक खिन्न सूर.
अर्थ तयांचा पुरता
नाकळतो जई तुम्हा
तई लावितां संगति
आपापल्यापरी त्याची
आणि नाना करीतसां
सहकंप उपचार...

चंडोलाचें मंद्र गीत,
हिंडोलाचें मत्त नृत्य
रत्नमंचकांची रास
दीप्त कीर्तीचा उद्‌घोष;
असंख्यात सुहृदांचा
सांद्र जिव्हाळा छायेचा
घट्ट विळखा दाहक
द्राक्षकन्येच्या कायेचा...

असे लाख नजराणे
पुढे माझिया ठेवतां
परी विरेना मुळीही
मनांतली नीरवता.

सौहार्दातें जागुनिया
देतां तुम्ही जें जें मज
असें सारें तें तें इथे
माझ्याजवळी सदाच;
परी भोगतां तें नित्य
मन न दे प्रतिसाद
जेंवि जिव्हा रोगार्ताची
असे नीरस बेचव.
ऐकायाचें म्हणोनीच
ऐकतसें मी गायन,
करायाचें म्हणोनीच
करीतसें मी भोजन;
मिठी घालिते रमणी
म्हणोनी मी करी प्रीत,
जन नाचविती शिरीं
म्हणोनी मी ये खुषींत...

हेंच शल्य, हीच खंत
माझ्या शून्यतेचें गूढ
नाही वाटत कधीही
उत्कटता कशांतच !!
जई लाभेल जराशी
धुंद घन उत्कटता,
दूर पळेल तईंच
स्तब्ध बधिर शून्यता

—वसन्त निनावे

सुमेरु　　　　(मुक्तछंद)

घनान्ध तिमिरीं द्रष्टयांचें पाऊल
भविषत् बिम्ब, भविष्यत् चाहूल !
घोर-अघोर धुंद मरुस्थळ
दुर्दम्य निर्धार
जेथ वाकलें निर्धारी सर्वांग,
तेथ उभा मी हचुएन्त्संग

कालसागरीं—
स्मृतिशेषरत्नें अनन्त दडलीं.
सांगाडे, सापळे, असंख्य असंख्य
भेडसावित धावती माघारी
अकाळ विक्राळ भीषण क्रंदन
त्यांत उमललें—
　　देदीप्यमान रत्नकमळ !
दिव्यज्योति, दिव्यप्रभा, दिव्यांग
तेथ उभा मी हचुएन्त्संग !

ध्यास, निदिध्यास
लागला जिवास
सत्य सत्यमित्र लिही इतिहास—
इतिहासाचीं पानें देशपर्यटनें
जेथ निमिषीं उकलली उर्मी
तेथ अतर्क्य उसळली लाट
लाटांवरी थाट, नर्तनांचा थयथयाट!
सारे अद्‌भुत, अगम्य, अथांग
तेथ उभा मी हचुएन्त्संग !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्जन मरुस्थली
खवळला दर्या,
फोफावल्या लाटा,
घेरिलें, वेढिलें तये मजला
घाबरलों मी, गोंधळलों मी
क्षणमात्रच--
तोंच दूर त्यावरी सुमेरु पर्वत
दृष्टीस भेदण्या खडें आकर्षण
मनीं उसळली आकांक्षेची लाट
चढावें तया शिखरी, पण--
तळी-वरी निराधार-अधर, अन्त न
शहारलें रोमरोमीं मदांग
तेथ उभा मी हचुएन्त्संग !

अनन्तव्योमीं, अनन्त सागरीं
अधर अधांतरी एकला मी
तोच पदतली अनाधार-आधार
शतदल नौका लागली,
आणि—
अवचित पोचलों सुमेरु तळीं
प्रभंजनाचा आला प्रचंड झोत
नौका निसटली खाली अन् मी-
झालों आरूढ शिखरावरी !
परी, सभोती अथांग, अथांग
सुमेरुवरी खडा मी हचुएन्त्संग !

क्षितिजापार गोचरे लखलखाट
दिव्य तेजोबिम्ब गो-तम-बुद्ध
अन् सुप्ततेंतुनी झालों मी शुद्ध !

—तु. ना. काटकर

घागर

मी मातीची नश्वर घागर
स्थान परंतु मला घरोघर

गळ्यांत माझ्या सदैव बंधन
हृदयीं माझ्या निर्मल जीवन !

--बाबा मोहाड

"क्षितिजावरती आग लागली !"

जुन्या पुराण्या कुचकामाच्या
उदर फाडुनी घनमेघाचें
उधळित चैतन्याची धारा
करीत सिंचन मांगल्याचें
बिंब उगवलें विश्वा उजळित
प्रकाश भरला दिशांदिशांमधि
माळावरला पिंपळ बोले,
"क्षितिजावरती आग लागली !"

जुनाट पिंपळ वठला पिंपळ
कालाघातें शिणला पिंपळ
थिजले डोळे रक्त गोठलें
मरणपथावरचा हा पिंपळ
प्रकाशभीरू जणुं घुबडासम
सृजन पाहुनी नवीनतेचें
भेदरलेला उठे ओरडुन,
"क्षितिजावरती आग लागली,
क्षितिजावरती आग लागली ! "

--रमेश वाबगांवकर

ओढा गुंतवळ

मोजुनी घ्या छाताडोची
हाडें कितिक गणती
एकेक विलग अगदी
खुलुनी टेकडी समान !
चैतन्य म्हणता तुम्ही
मृत चैतन्य तें अमुचें
कोंडुनी या कुडींत
सापळेच मूर्तीमंत
घ्या खुशाल आम्हां आंत
पुढेच जाईल विज्ञान !!

अमुच्या हाडीं का मांस ?
अन् त्यांत का त्या पेशी ?
अणू पेशींत का अमुच्या ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

जे वावरती देहीं तुमच्या ?
छे ! ना मानव आम्ही
केधवाच जाणलें पुरतें !

मग धांडस कसचें ?
मागणी करण्याचें ?
बापुडया भिक्षापात्राचें
कसचें भाग्य भालीं
सामोरी तुम्हास येण्याचें?
हाय ! आम्ही अभागी !

लोहाने खुलावें पिवळें
कितिक ते झाले
सुवर्णाशीं खाणींतल्या
स्पर्धा पिसाट करावी !
विस्मृतींत टाका परीस !
परीस का पृथ्वीवर ?

झेंडुने उद्धटपणे
खूपच खूप खुलुनी
पाकळीस एकेक गोंजारावें
करावी भुवई वक्र
अन् जावें गुलाबराजाशीं
हस्तांदोलन करण्यास
अद्‌भुत !
लालित्य कोठलें झेंडूंत !

स्वर्गीच्या अप्सरेचें
लावण्य लवलवतें बघुनी
किस्पट मानवाने
मोहुनी जावें पुरतें
अन् नवलची घडावें
का मागणी घालावी ?
उगीचच !
अप्सरा तो वरती !
ना मानव !

✳

अन् या की एकदा
टीचभर देहावर
बघा ना एकदा धुंडून
लघु शिल्प घरेचें
जणू कोरलें छान !
दऱ्या टेकडया
पत्थरी कडे
ना आगळे छाताडाहून
गंगामाई पावन
दर्शनार्थ कशाला काशी ?
नेत्रांतून खोल
वाहे सरिता छानशी !
हें आमुचें भाग्य
खुलुनी भाळीं दिसतें
मूढच ते !
जे आमुच्यासाठी
गाळती अश्रू दोन एकांतीं !
सज्जन ! नको अश्रू दोन

✳

घडेल मायावी चमत्कार
तप्त लखलखतें
रसरसतें खळखळतें
धातुरस पोटीं
अन् जर किंचित
थेंबच एक सलील
आंत शिरलें
अवघी वाफ
व्यापली पूर्ण स्थिती !

एकाहून एक
जाणवेल धक्का
राक्षसी प्रत्येक
व्याकुळ धरणी
निश्चित होईल
विषमतेचें असेच

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुंतलेले धागे
ओढा गुंतवळ
काचुं द्या अमुचे गळे
पडूं द्या बाहेर जिभल्या
परी नका तोडूं ती
लुप्त व्हाल अंतराळीं !

—भास्कर कविमंडन

उसवूनी जुने टांके

रेखाटलीं रम्यचित्रें
राबवून कल्पनेला
नाही जीव तयांमाजी
पेंढा दिसे भरलेला.

काव्य नुरे...वांझ झाली
कल्पवेली अकस्मात,
कधी कधी दुपवते
प्रतिभा ही अकल्पित.

दिव्य गुण तिचे सारे
निर्गुणच झाले आता
वेडेपिसें मन...होतां
कोष उन्मेषांचा रिता.

प्रतिभेस आज माझ्या—
असें कांही तरी होतें
उसवूनी जुने टांके
नवे तेथेच घालते.

चूक बालिश बोलांत
आढळते पाखरांच्या
रमणीचें रक्तमांस
दिसे आड सौंदर्याच्या.

बाई ! आवर कोकिळे
कर्णकटू तुझें गान
तुझ्या पंचमांत स्फुरे
माझ्या रुदनाची तान

मयूराचा आर्त टाहो
ऐकुनिया कल्पनेला—
—नाही येत चेव कांही,
ओघ भूमिगत झाला.

—जेथे रम्यत्व पाहिलें
—जेथे लालित्य ओतलें
—वस्तुमात्रीं लावण्याचें
—तेज दिव्य खुलविलें

गेलें कवच गळोनी
फिटे पालव आडचा
दिसे अलौकिकामाजीं
शुद्ध गाभा लौकिकाचा

कल्पनेच्या मनीं घोळे
भाकरीचें दिवास्वप्न
दिडकीच्या लाभासाठी
तिचे खपतात यत्न

प्रतिभेची प्रीत जडे
राजकवींवर गाढ...
...आणेलीच्या संगीताचा
नाद वीणेहूनि गोड !

—गणेश पाठक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वा, बुद्धिमान मानवा !!

लेखक--लीन यूटांग

अनुवादक--वैकुंठ ग. इंगळे, काटोल

जीवनाचं, पंचपक्वान्नांनी भरलेलं ताट आमच्यासमोर आहे. या मेजवानीकरितां आमच्या मनांत अभिलाषा आहे किती ? पूर्ण ताटावर कबजा करण्याची चढाईची, मतलबी प्रवृत्तीच आमच्या बाबतींत दुर्दम ठरू पाहत आहे. काय हा नतद्रष्टपणा ?

हा झगडा आम्ही टाळायला पाहिजे. बंधुत्वाचं व 'अद्वेष्टा सर्वभूतानाम्' चं स्वप्न साकार करायचं असेल तर समाजशरीरांतल्या भेगा आम्ही बुजविल्या पाहिजेत. पुरुषार्थाच्या वाटणींत जी दुष्ट विषमता आज घटकेला आहे तिचा निरास करावयाला पाहिजे.

अमर्याद संग्रहाची बेसुमार प्रतिष्ठा, त्याच्या पोषणाकरितां हजारोंना करावे लागणारे जीवापाड कष्ट, त्यामुळं पिचून निघालेली व दुर्बळ झालेली शरीरें आणि या सर्वावर कळस म्हणजे यांतून निर्माण झालेल्या श्रमजीवींचं रक्त चाखणाऱ्या संस्कृतीचा जुलूम–ही मानवाच्या आजच्या दुर्दशेची कारणपरंपरा आहे. मनुष्याला केवळ आपल्या निर्वाहासाठीच राबावं लागतं असं जगानं म्हणावं, मनुष्य काम करतो कारण तें त्याला करावंच लागतं असा निसर्गानं टाहो फोडावा. या जीर्ण संकेताच्या गजबजाटानं सारं जग दुमदुमलेलं. पण प्रश्न असा उपस्थित होतो की कांहींचा ऐदीपणा पाळतो तो कशाच्या बळावर ? याला जबाबदार ? श्रमाची चोरी करतो कोण ? निसर्ग ? नाही. ईश्वर ? ईश्वरशपथ नाही. तर केंद्रित धनाचा उपभोग घेणारी भांडवलशाही पद्धती. हें असं जर आहे तर आजच्या संस्कृतीनं निर्माण केलेले तडे नष्ट करायला नकोत का ? त्यांतून या संस्कृतीच्या प्रगतीच्या पावलागणिक मानवी जीवन अधिकाधिक बिकट होत चाललं आहे. कर्तव्य, जबाबदारी, भीति, निषेधाच्या मूठभर धनिकांनी लादलेल्या भावनांच्या दडपणानं कामकऱ्यांचीं मनं भेदरलेलीं आहेत. ही गुंतागुंत नैसर्गिक नाही. मानवनिर्मित व औपाधिक आहे.

खिडकीशेजारच्या मेजावर बसून, मंदिरांच्या कळसाभोवती विहरणाऱ्या पाखरांचं मनोहारी दृश्य मी पाहत आहे. मी काय खाईन ही चिंता त्याला नाही की संध्याकाळच्या जेवणाची भ्रांत नाही. कबुतरालासुद्धा निर्वाहासाठी माणसापेक्षा कमी श्रम करावे लागतात.

भूक भागविण्यासाठी मी अनेक वस्तु विकत घेतों. हजारो मनुष्यांच्या (मला सोडून) कामाचं फळ असलेल्या नांगरणी, पेरणी, कापणी, एकत्रीकरण अशा कितीतरी एकाहून एक कठीण अवस्थांमधून राबून मनुष्याला आपली जीवनसामुग्री जुळवावी लागते. अरेरे ! चतुष्पाद प्राण्यांपेक्षाहि मनुष्याची स्थिति शोचनीय असावी ना !

जंगलामधून एखादा प्राणी गावांत आला, त्यानं मनुष्याचं आत्यंतिक व्यग्र व व्यावर्तक जीवन पाहिलं तर तो म्हणेल, छे. यांच्यापेक्षा आपलं जीवन किती तरी सुखकर ! आणि वरिष्ठानं कनिष्ठाकडं तुच्छतेनं पाहावं तसं पाहत त्याची अशी मनोमन खात्री झालेली राहील की 'पृथ्वीच्या पाठीवर मनुष्य हाच काय तो राबणारा पशु आहे.' बैल, म्हैस असे कांही प्राणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सोडल्यास (कुत्र्या मांजरांना–देखील) माणसाइतकं कामाच्या रामरगाड्याला जुंपलेलं राहावं लागत नाही. घराची रखवालदारी करणारा कुत्रा तो काय, आपल्यापेक्षा अधिक वेळ खेळण्या–बागडण्यांत घालवितांना आपण उघड्या डोळ्यांनी पाहतोच की नाही ? सकाळच्या कोवळ्या उन्हाचा 'चटका' त्याला जीभ बाहेर काढायला भाग पाडतोच की नाही ? इतकंच काय मांजर तरी किती ऐषआरामी व छानछोकी ! तिला तर कामाशिवाय जगणं सहजच शक्य होतं. शेजारी तिला घराचीं दारं बंद ठेवण्याचा लाख प्रयत्न करतात. पण व्यर्थ. या सर्व कडेकोट बंदोवस्तावर मात करून ती आपला अनिरुद्ध, वेलगाम संचार सर्वत्र चालूच ठेवते.

राहता राहिला मानव. लाजिरवाण्या रीतीनं गुलामीच्या शृंखलांत जखडलेला. आपली श्रमशक्ती भांडवलाला विकून त्याचा वाईट रीतीनं झालेला गुलाम. तो माणसाळलेला आहे इतकंच. कधी संपेल विचाऱ्याचं नष्टचर्य ? नांव नको. आजच बाजारू संस्कृति व समाजाची घडण त्याला जादा कामाला विवश करतेच. जणू कांही ह्याच अल्पसंतुष्ट गुरासारख्या जीवनांत मोक्ष साठविलेला.

जगांत उच्चतर ज्ञानाचा आनंद आहे, प्रियजनाबरोबरच्या संभाषणांतील माधुर्य आहे, कल्पनासृष्टींतील शीतल रमणीयता आहे आणि———आणि मानवी जीवन खडतर झाल्याचं प्रत्यंतर तर सर्वांत दारुण आहे. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मानवी शक्तीचा ९० टक्के भाग हा उदरपोषणासाठीच खर्च होतो. मग आजची संस्कृति म्हणजे तरी काय ! दोन वेळचं जेवण मिळविणारा व्यवसायच की नाही ? विकास म्हणजे काय ? पोटोबा पूजण्याच्या व्यवसायाला दिवसेंदिवस उदंड कठीणपणा आणणारी प्रक्रियाच की नाही ?

शहरांतील या प्रासादतुल्य इमारती पाहून माझं मन व्याकुळ होतं. वीट, दगड व (मानवी रक्तामांसाच्या चिखलानं) बांधलेल्या या आकाशाशीं स्पर्धा करणाऱ्या महालांतून माणसें राहतात. कांहींमध्ये मात्र हजारो पार्टिशनस्— लावले जातात. या दालनांना खिडक्यामागून खिडक्या असतात. क्षणैक आरामीचा आभास निर्माण करणाऱ्या प्रत्येक किंवा जास्तींत जास्त दोन दोन खिडक्यांच्या मागं मानवता छोट्या छोट्या परिवारामधून राहते. हे लोक येथे राहतात कसे व आपापला प्रपंच या खोपटांमधून थाटतात कसे हा प्रश्न मनांत आला म्हणजे अंगावर काटा उभा राहतो. याच एका दृश्यानं माझ्या मनाची समदर्शी अवस्था साफ उधळून लावली आहे. याच त्या दृश्यामुळं मला 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय'च्या चळवळीशीं कायमचं निगडित व्हावं लागलं आहे.

खिडकीच्या थोड्या बाजूला, कबुतरांनी खुराड्यांत लोळावं त्यागत तेथे पति–पत्नि झोपतात. आणि शेजारी मुलं. तिथंच जेवण, तिथंच बैठक, तिथंच गृहसंस्कार आणि तिथंच सर्व कांही.

सकाळ होते. नवरा अश्रूंच्या घोटाबरोबर चहाचे दोन घोट घशाखाली सोडतो. मजुरीसाठी बाहेर पडतो. बायको भोजनसामुग्रीसाठी त्याची प्राण डोळ्यांत आणून वाट पाहते. आशेची फुलवात तिच्या डोळ्यांत लागलेली असते.

संध्याकाळीं थोडे बाहेर पडतात. मोकळ्या हवेंत श्वासोच्छ्वास करतात. आणि मग तींच मुलं, तीच रात्र, तेंच तें खुराडं, तेंच तें दुष्ट चक्र. थकव्यामुळं, श्रांतपणमुळं अशी कांही डारांडूर झोपतात की जणू त्यांनी चिरनिद्रेलाच कवटाळलं आहे. हेंच त्यांचं जीवन. हीच त्यांच्या जीवनाची नवलाई.

मूठभर श्रीमंत मात्र सर्व सुखसोयीयुक्त महालांत राहतात. ते 'सुखी' असतात अशांतला भाग नाही. त्यांच्याहि संकटांना (पण रमणीय हं) गणती नसते. त्यांच्यापासून दूर राहण्यासाठी म्हणून, त्यांच्या भेसूरपणापासून दूर राहण्यासाठी म्हणून ते कृत्रिम अमोदप्रमोदाचा आश्रय घेतात. अन् आपल्या पैशाचा चुराडा करतात. आणि या नैराश्यमोचनाच्या असफल प्रयत्नाला नांव काय देतात काय तर 'मनोरंजन.'

जीवनांतल्या निर्जीव आकड्यांना व रुक्ष वास्तवतेला ते विटलेले असतात. संत्रस्त मनाला विरंगुळा म्हणून 'मनोरंजनाच्या शोधांत' बाहेर पडतात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थिर्येटरांमधून चलच्चित्रं पाहतात. स्त्रियांच्या उत्तांगाचं भडक व नंदो प्रदर्शन पाहतात. याचा परिणाम, याची फलश्रुति अधिक मानसिक विकृति, अधिक वेदनानिग्रह-पर औषधी, बिलाच्या हप्त्यानं डोळे पांढरे करणारे रोग, अधिक पोटशूळ. अपेंडिसायटीस नि अग्निमांद्य, अशक्त डोकं नि कठोर यकृत, सुटलेलं पोट नि भारी-भरकम शरीराचा बेडौल घाट, सुजलेलं मुत्राशय नि अत्याचारग्रस्त शरीर, पाठीला समांतर भिडलेली छाती नि वेरीवेरी अन्, अन् आहारनाश व काळीज जाळणारी शरीराची विवंचना. नाना रोग. नाना व्याधि. मानसिक स्वास्थ्य बिघडलेलं. शरीरप्रकृतीचा विचका झालेला. आणि या सर्वांचा प्रतिकार करण्यास शरीर कमकुवत. या चित्रावर परिपूर्णतेचा रंग मारायचा झाला तर असं म्हणावं लागेल की 'अमेरिकेंत' आज कुत्रीं अधिक दृष्टीला पडतात, मुलं कमी.

मग गरीब संसार करतात म्हणजे काय करतात? उत्तर अगदी सरळ आहे. धोबी न्हावी व हॉटेलचा पोऱ्या यांचे कपडे धुतो. पोऱ्या उलट धोब्याला जेवायला वाढतो. या दोहींच्या मोबदल्यांत न्हावी धोबी व पोऱ्या यांचं केशवपन करतो. (कर्तन नव्हे.) आहे ना ही अद्‌भुतरम्य गोष्ट?

हे सर्व घरकोंवडे. सदैव आपल्याच ठिकाणीं व्यवसायजाल विणत रहावं लागतं विचाऱ्यांना. उभ्या जन्मांत बाहेरच्या जगांत शिरण्यास आपलं कामगृह (workshop) त्यांनी सोडलेलं असतं की नाही याची वानवाच असते. भांडवलशाही संस्कृतीचा जयजयकार असो.

धन्यवाद त्या दयाघनाला की एखादे वेळीं हा गृहस्थ रस्ता चुकून सिनेमाला निघून जातो. या ठिकाणीं पक्षांच्या गीतांची अनुपमेय मधुरता. विकासक्षम वृक्षांच्या डेरेदार हिंदोळ्याची डौलदार चळवळ स्वप्नवत् कां होईना त्याच्या करपलेल्या मनावर विरंगुळ्याच्या अमृताचं, समाधानाच्या सुधेचं सिंचन करतात. जगांतल्या झाडून साऱ्या गोष्टींची त्याच्या तृषार्त व भुकेल्या चर्मचक्षूंना दुर्मिळ व सुखद अशी भेट होते. पुलकित होऊन जातं त्याचं सर्वांग क्षणभर.

ते तिथं तुर्कस्थान पाहतात. ताजमहाल, हिंदुस्थानच्या उंचीचा मानदंड असा हिमालय, घोंघावणारं वादळ, जहाजांची जलसमाधि, अति सूक्ष्म असे कृमि-कीटक आणि विंचू यांचीं युद्धं आणि शीतलता व सौंदर्य यांचा मणिकांचन संगम असा चंद्र पण— सारं, सारं पाहतात.

वा; वुद्धिमान मानवा!! आम्ही तुझ्या थोरवीचं सदैव गुणगान करतों. तुझ्या महत्तेवर प्रशंसेचीं फुलं मुक्तपणानं उधळतों. आमच्या अंतःकरणांत सुरम्य सौरभानं विकसित आदरांजलि तुला अनन्य निष्ठेनं वाहतों.

पण आम्हाला केवळ पोट भरण्याच्या संकीर्ण ध्येयाला वाहून घेऊन, त्यांतच केस पांढरे करावे लागावेत ना? आमच्या जीवनाची वाढीसाठी घडपडणारी विकासोन्मुख कळी या रगाड्यांत चुरगळून जावी ना! याच कृपण हेतुपूर्तीकरितां खेळणं, बागडणं, वाङ्मयानंद इत्यादि उच्चतर गोष्टींना मुकावं लागावं ना!

अगाध आणि अगम्य आहे, वा मानवा, तुझी ही वर्गनिष्ठ संस्कृति.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथसमालोचन

'रस आणि सुवास'

[कवितासंग्रह; कवि–भवानीशंकर श्री. पंडित; प्रकाशक–अ. ह. लिमये, एम्. ए., व्हीनस, बुकस्टॉल, अप्पा बळवंत चौक, पुणें.]

सुप्रसिद्ध कवि व मराठी कवितेचे रसिक टीकाकार प्रा. भ. श्री. पंडित यांचा हा तिसरा कवितासंग्रह नुक्ताच प्रसिद्ध झालेला आहे. 'उन्मेष आणि उद्रेक' या प्रा. पंडितांच्या दुसऱ्या कवितासंग्रहाच्या मानानें हा संग्रह अल्पावधींतच प्रकाशित झाला असें म्हणावें लागेल. प्रस्तुत संग्रहांत प्रा. पंडितांच्या काव्यरचनेचे मौलिक गुण प्रगट झालेले असून त्यावरून गेल्या पिढींतील काव्यपरंपरेचा परिचय होण्यास मदत होते. 'भावना ही सुवासासारखी आहे' व 'विचार हे रसाप्रमाणे असतात असा यांवासंबंधीं खुलासा प्रा. पंडितांनी केलेला आहे. तो औचित्यपूर्ण आहे. भावना व विचार यांचा समुचित समन्वय प्रस्तुत संग्रहांत झालेला आहे. आशय व अभिव्यक्तीचा विविधपणा हा प्रा. पंडिताचा काव्यविशेष या संग्रहांत नव्याने प्रत्ययास येतो. गेल्या पिढींतील मान्यवर कवींच्या कवितेंतील वैचारिक साम्यस्थळेंहि क्वचित् निदर्शनाला येतात.

रचनाकौशल्याचा हव्यास हा प्रा. पंडिताचा स्थायी भाव आहे. युगान्त (पा. २८) श्यामकिशोर (पा. ३७ व ३८) स्मृतिशल्य (पा. ४२) या कवितांतील शब्दसौंदर्य प्रासपूर्ण व नादमधुर आहे; व ओघ प्रवाही व प्रसन्न वाटतो. मानवतावाद व श्रमसत्तावाद याला अनुलक्षून कवीने काव्यरचना केलेली आहे. श्रमसौंदर्य (पा. ५६) देवदानवांतील दुवा (पा. ६२) श्रमजीवी चाकांनो (पा. ३४) या कविता येथे लक्ष्य आहेत. विद्यमान् सामाजिक व राजकीय जीवनांतील घडामोडींचा परामर्ष प्रा. पंडितांनी आपल्या कवितेंतून घेतला आहे. त्यांचा आविष्कार रमणीय असला तरी या कवितांचें अंतरंग प्रासंगिक व स्थूल स्वरूपाचें वाटतें. रझाकारांच्या अनन्वित अत्याचारांवर लिहिलेली 'वामनास आवाहन' (कविता ३५) भाषिक वादाला उद्देशून लिहिलेली 'भाऊभाऊ' (पा. ५७) देशाच्या विभाजनावर लिहिलेली 'भाऊबंदकी' (पा. ५१) 'दिल्ली चलो' या घोषणेवरील 'इंद्रप्रस्याकडे' (पा. ४२) या कविता या धर्तींच्या आहेत.

'स्वतंत्र भारत' 'राष्ट्रध्वजास' 'महात्मा' या राष्ट्रीय स्वरूपाच्या फुटकळ कविताहि प्रा. पंडितांनी रचलेल्या आहेत. प्रेम, प्रणय, शृंगार यांची प्रतीति 'तुझे डोळे' (पान ६५) 'सहचरीस' (पान ९७) इत्यादि कवितांतून येते. 'तूं हास' (पृ. ७१) 'अर्वाचीन अर्जुन' (पृ. ४६) या कवितांतून आशावाद व 'आईचें लाडकें' (पा. ३९) व कौतुक (पा. ५४) या कवितांतून वत्सल रस प्रत्ययास येतो. 'तें माझें घर' 'ध्येय वारणा' 'युगान्त' या नावाजलेल्या कवितांचा या संग्रहांत समावेश झालेला असल्यामुळे या संग्रहाची लोकप्रियता वाढल्याशिवाय राहणार नाही.

व्यक्तिवाद कुटुंबवाद व मानवतावाद या क्रमाने प्रा. पंडितांची कविता उत्क्रान्त होत गेलेली आहे. संकुचित व्यक्तिवादांतून विशाल ध्येयवादांत तिचें पर्यवसान झालेलें आहे. त्यामुळे तिचें स्वरूप कधी अंतर्मुख तर कधी बहिर्मुख असें दृग्गोचर होतें. कवि व काव्य याबाबत त्यांची भूमिका निःसंदिग्ध आहे. कवीच्या व्यक्तित्वाचा आविष्कार काव्यांतून होतो. हा सिद्धांत त्यांनी आपल्या अनुभूतिद्वारा स्पष्ट केलेला आहे. 'मला माझ्या काव्यांत पहा' या कवितेंतील कांही ओळी संस्मरणीय आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मला माझ्या काव्यांत पहा तुम्ही
त्यांत दर्शन देईन तुम्हाला मी
जसा पुष्पाच्या अंतरीं सुवास
असे माझा काव्यांत तसा वास

प्रा. पंडितांच्या कवितेंत 'गोदी' (कौतुक, पा. ५४) 'बारबार' (श्रमसौंदर्य, पा. ५६) 'खोज' (तूं हास, पा. ७१) हे हिंदी शब्द आलेले आहेत. त्यामुळे यमकसौंदर्य साधलें आहे. मराठी कवितेला वेगळें वळण मिळत असून तिच्या अंतरंगांत मूलभूत बदल होत आहे. तिच्या उद्गमाशीं जुनी सौंदर्यवादी परंपरा आहे. तीहि अव्याहतपणें व प्रामाणिकपणें आपलें अस्तित्व टिकवून आहे. 'पिचलेला पावा' 'उन्मेष आणि उद्रेक' आणि 'रस आणि सुवास' या तिन्ही संग्रहांतील कवितांचें स्वरूप प्राय: सारखेंच आहे. प्रा. पंडितांची कविता नव्या दृष्टिकोनाप्रमाणे विकासशील नसेल, पण तिचा छंद व धारणा स्वतंत्र व स्वयंभू आहे; त्यामुळें महाराष्ट्र काव्यपरंपरेंत तिचें स्थान अबाधित व निरपवाद आहे.

--भ. प्र. मोहरीर.

रसधारा

[कवितासंग्रह संपादक--प्रा. भवानीशंकर श्री. पंडित, एम्. ए.; प्रकाशक-अ. ह. लिमये, व्हीनस बुकस्टॉल, अप्पा बळवंत चौक, पुणें २.]

अग्रेसर व नामवंत आधुनिक कवींच्या काव्यांतील निवडक वेचे प्रा. भ. श्री. पंडित यांनी संपादिलेल्या 'रसधारा' या कवितासंग्रहांत गुंफलेले आहेत. या कवींत नारायण वामन टिळक, लक्ष्मीबाई टिळक, केशवसुत, माधवानुज, चंद्रशेखर, विनायक, बी, तांबे, दत्त, गोविंदाग्रज, रेंदाळकर, बालकवि या महाराष्ट्रसारस्वताला भूषणभूत असलेल्या वागीश्वरांचा अंतर्भाव केलेला आहे. आधुनिक कविपंचकांव्यतिरिक्त अन्य कवींना योग्य स्थान देण्यांत आल्यामुळे प्रस्तुत संग्रहाचें स्वरूप समावेशक झालेलें आहे. लक्ष्मीबाई टिळक यांचा अंतर्भाव प्रातिनिधिक दृष्टचा महत्त्वाचा तर आहेच पण त्यापेक्षा तो काव्याच्या यथार्थ मूल्यमापनाच्या दृष्टीने अधिक महत्त्वपूर्ण वाटतो. आधुनिक कवींत माधवानुज, रेंदाळकर हे थोडेबहुत उपेक्षित आहेत. बी यांच्या काव्याचें गुणग्रहण अलीकडे होऊं लागलें असून त्यांच्या प्रतिभाशक्तीचा गौरवहि होतो. त्यांना या संग्रहांत दिलेलें स्थान न्याय्य व स्तुत्य आहे. इ. स. १८९० ते १९२० या कालखंडांत जें अंत:प्रवाह प्रामुख्याने वहात होते ते समोर ठेवूनच संपादकांनी कवितांची निवड केलेली आहे.

या कविताकलापावरून विविध मनोवृत्ती आणि प्रवृत्ती यांचें दिग्दर्शन होतें. प्रीति, कौटुंबिक स्नेहसंबंध या व्यक्तिगत प्रवृत्तींप्रमाणे देशभक्ति, समाजोन्नति, निसर्गप्रीति या व्यापक मानवी भावनांची अभिव्यक्ति प्रस्तुत संग्रहांतील कवितांतून झालेली आहे. यावरून संपादकांची औचित्यबुद्धि व तारतम्य प्रगट होतें. पहिल्या दर्जाच्या मराठी कवींच्या कवितेंतील निवडक वेचे शोधण्याचें काम जिकिरीचें व जोखमीचें असतें. तें पार पाडतांना प्रा. पंडितांनी चोखंदळपणा व रसिकपणा दाखविला आहे. या संग्रहाला आरंभीं प्रास्ताविक जोडलें असून कवितांच्या शेवटीं चरित्रविषयक, अर्थनिर्णायक व अवांतर टीपा जोडल्या आहेत. प्रस्तावनेंत मराठी काव्यप्रवाहाचा धांवता परामर्ष घेतलेला आहे. चरित्रविषयक टीपांतून वेगवेगळ्या कवींचें गुणदोष-समालोचन मार्मिकपणें केलेलें आहे. त्यावरून प्रा. पंडितांचें संकलनकौशल्य दिसून येतें.

आधुनिक मराठी कवितेचे इतिहासकार म्हणून प्रा. पंडित सुपरिचित आहेत. याची साक्ष चरित्रविषयक टीपांवरून आल्याखेरीज रहात नाही.

लक्ष्मीबाई टिळक यांच्या काव्याविषयी लिहितांना 'त्यांच्या लेखनांत भावनांचा प्रामाणिकपणा, विचारांचा प्रांजलपणा आणि भाषेचा साधेपणा हे गुण आहेत' हा दिलेला अभिप्राय विचारपूर्ण आहे. 'बी'ची कविता तोलाने कमी पण मोलाने भारी आहे. उगीच भराभर व भाराभर त्यांनी लिहिलें नाही. वैचारिकता हा त्यांच्या कवितेचा आत्मा आहे. पुन्हा या वैचारिकतेंत कोठेहि विसंवाद, विसंगति अथवा विरोध नाही हें विशेष आहे' हें 'बी'च्या कवितेवरील विधान मननीय वाटतें. चंद्रशेखर यांच्या काव्यांत 'अहंवाद व अंतर्मुखता नाही. परंतु वर्णनाची बेधकता व कथानकाची कला-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुशलता आहे' हे त्यांनी व्यक्तविलेले विचार चंद्रशेखरांच्या कवितेचें मूल्यमापन अचूकपणें करतात.

'केशवसुतांचा संप्रदाय' या शब्दप्रयोगावर प्रा. पंडितांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात, 'केशवसुत' हे या पिढींतील एक प्रतिभासंपन्न अग्रेसर कवि होते हें खरें. परंतु स्वतः त्यांनी एखाद्या विशिष्ट मतप्रणालीच्या प्रचाराकरिता असा एकादा संप्रदाय काढला होता असा इतिहासांत कुठेहि आधार नाही.' केशवसुत हे जात्याच अंतर्मुख व आत्मप्रवण कवि असल्यामुळे त्यांनी काव्यविषयक संप्रदाय काढणें संभवत नव्हतें. मात्र आधुनिक मराठी काव्याच्या उत्क्रांतीचें श्रेय केशवसुतांना निश्चितपणें द्यावें लागतें. मराठी कवितेच्या अंतर्वाह्य परिवर्तनाच्या मुळाशीं केशवसुतांची कविता आहे. ती मराठी कवितेच्या आगामी विकासाचा एक मोठा दुवा आहे. तो ध्यानांत घेऊनच टीकाकार केशवसुतांचा संप्रदाय या शब्दप्रयोगाचा उपयोग करतात. तो आक्षेपार्ह असूं नये असें वाटतें. प्रा. पंडितांनी स्वतः विवेचिलेल्या 'तिसऱ्या पिढींतील' कवींत केशवसुत हेच अग्रणी ठरतात.

प्रा. पंडितांचा हा उपक्रम अभिनव व अभिनंदनीय आहे. प्रस्तुत कवितासंग्रहाचा अंतर्भाव विद्यालयीन अभ्यासक्रमांत केल्यास तो विद्यार्थ्यांना निःसंशय उपयोगी होईल व प्रा. पंडितांच्या श्रमांचें सार्थक होईल.

—भ. प्र. मोहरीर

वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी

[लेखक : वा. ल. कुळकर्णी, प्रकाशक : पॉप्युलर बुकडेपो, मुंबई ७; पृष्ठें १६८; किंमत ४ रुपये]

वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी या प्रा. कुळकर्ण्यांच्या पुस्तकांतील पुष्कळसे लेख यापूर्वीच 'अभिरुचि', 'सत्यकथा' इत्यादींतून वाचकांच्या परिचयाचे झाले आहेतच. तरी हे पंधरा लेख परत एका बैठकींत वाचतांना विचार–सौंदर्याच्या दर्शनाचा नवा प्रत्यय येतो. कांही लेख तत्त्वचिंतनपर आहेत. साहित्यांतील मूलग्राही प्रश्नांचें त्यांत विवेचन आहे. उदाहरणार्थ टीका : 'काल आज आणि उद्या' या निबंधांत उद्याबद्दल मुळीच चर्चा नसतांना टीकेच्या एकूण कार्यक्षमतेचा व पद्धतीचा परामर्श आहे. 'रस म्हणजे काय?' या निबंधांत रसत्व भावना या क्रियेंत नसून आस्वादानन्दांत आहे हें प्रतिपाद्य आहे. 'कला आणि चारित्र्य' निबंधांत विशुद्ध कलानिर्मिति व विशुद्ध कलावादाची चर्चा आहे. 'कला आणि स्वातंत्र्य : एक विचार' व 'कला–वाङ्मयांतील दोन प्रवृत्ति' हे या संग्रहांतील दोन महत्त्वाचे लेख असून त्यांतील विवेचनाने मराठी वाङ्मयीन मूल्यांच्या शास्त्रीय विवेचनांत एक नवीन भर पडते. 'सर्वंकषसत्ता व गद्य-पद्य वाङ्मय' थोडेसे व्यक्तिचित्रणाविषयी आणि 'आत्मचरित्र : कांही विचार' त्यांच्या पूर्वीच्या लेखसंग्रहांतील कोएस्लरच्या कादंबरीवरील विचारांच्या अनुवादाप्रमाणे येथे अनुक्रमें ऑवेल, ई. एम्. फार्स्टर, स्पेन्डर व ऑडेनच्या वाचनाचा परावर्तित परिणाम आहे. चिपळूणकर, केळकर, तुकाराम व मराठी एकांकिकाविषयक निबंध, वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांच्या उपयोगाचे आहेत. सामान्य वाचक, ऐतिहासिक कादंबरी, कला–वाङ्मयांतील नवें आणि जुनें हे, नुसते साहित्यिक वास असलेले लघुनिबंध आहेत. त्यांत नवीन असें कांही नाही. कुळकर्ण्यांच्या जुन्याच आवडत्या सिद्धांतांची ती निव्वळ चर्वणा आहे. हा झाला सामान्यपणें पुस्तकाचा परिचय.

पण वाङ्मयशास्त्राच्या सखोल अभ्यासकापुढे जो महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो तो वा. ल. कुळकर्ण्यांच्या टीकाकार या भूमिकेविषयी आहे. ते वारंवार म्हणतात की वाङ्मयकला 'शुद्ध' असावी. त्यांत 'व्यक्तिनिष्ठा' हाच एकमात्र निकष असावा. 'वाङ्मयीन टीकेच्या प्रांतांत अ–वाङ्मयीन व अ–कलात्मक मूल्यें नेहमीच घुडगूस घालतांना दिसत असतात.' ही भूमिका मान्य केल्यावर त्यांचीं खालील विधानें व या चर्चांचा कोणता अर्थ उरतो? उदाहरणार्थ 'सर्वंकषसत्ता व गद्य-पद्यसाहित्य' हा सबंध निबंध त्यांच्या दिक्काल–प्रभावांतील 'विशुद्ध कले'च्या मूळ स्थापनेच्या विरुद्ध आहे. पृ. ८ वरील 'युरोपांतील गेल्या तीन वर्षांतील वाङ्मयेतिहासा'चें ज्ञान; पृ. ११ वर 'आपल्या कलाज्ञानाइतकीच समाजशास्त्र, अर्थशास्त्र,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इत्यादि समाजजीवनाच्या विविध अंगांनी विचार करणाऱ्या इतर शास्त्रांच्या ज्ञानाचीहि जरूरी आहे हें त्याच्या अधिकाधिक लक्षांत येऊं लागलें आहे.' पृष्ठ १६ वर ते म्हणतात–'नव कलेचें व नव वाङ्मयाचें कार्य त्रिविध आहे. दुष्ट, अनिष्ठ व बांडगुळवजा असलेल्या संकेतांचा संहार करणें, सत्याचें अनावरण करणें, व अधिकाधिक श्रेष्ठतर सत्यांबद्दल प्रेम, जिज्ञासा, जिव्हाळा निर्माण करणें." हें 'अधिकाधिक श्रेष्ठतर सत्य' निव्वळ आत्मनिष्ठेच्या व कलानिष्ठेच्या मूल्यांनी कसें ठरविणार ? येथे सामाजिकतेचीं, शिवाशिवाचीं मूल्यें आलींच की. प्रा. कुळकर्णी पुष्कळदां 'डिफेंडंट' शब्द वापरतात. घारापुरी येथील शिल्प व वेरुळच्या जैन गुंफांचें शिल्प यांची तुलना पृष्ठ ९० वर ते ऐतिहासिक कालक्रमानें करतात. ते पृष्ठ ८७ वर हेंहि मान्य करतात की 'जीवनाप्रमाणें कलावाङ्मयाचीं प्रगति याच अखंड विरोधाविकासांतून होत असते'; पृ. ७७ वर 'सर्वच कलावंतांना तें शक्य नसतें. त्यांचें जीवनाचें अवलोकन एकांगी असण्याची शक्यता आहे; व वरचेवर मनोवगाहनशास्त्राचे दाखले काय सांगतात? वाङ्मयकला जीवनानुभवाची अभिव्यक्ति आहे. जीवनानुभव व्यापक असूं शकतात. त्यांत साहित्याचा सवता सुभा नाही. असले 'हस्तिदंती मिनार' कधीच ढासळले आहेत. अशा स्थितींत लेखकाच्या जाणिवा या देशकालपरिस्थिति–निरपेक्ष कशा राहूं शकतात हें कुलकर्णीच जाणोत !

दुसरी गोष्ट 'कला आणि चारित्र्या'बद्दल एकीकडे लेखकाच्या 'इंटीग्रिटी'ची चर्चा करणें व दुसरीकडे त्याच्या चारित्र्याचा त्याच्या कलानिर्मितीशीं कांही एक संबंध नाही हें म्हणणें परस्परविरोधी आहे. तुकारामाच्या आत्मप्रत्ययाचें महत्त्व कुळकर्ण्यांना जें वाटतें तें या श्रेष्ठ 'इंटीग्रिटी'मुळे. 'कथनीं' व करणीं'त भेद असणें हें नव कवींत (सर्वंच संग्रहांत त्यांनी तीनच नांवें हयात कवींचीं दिलीं आहेत. मर्ढेकर, इंदिरा संत व विंदा करंदीकर) व त्यांच्या द्विधा खंडित व्यक्तित्वामुळे किंवा व्यक्तिमत्वशून्यतेमुळे म्हणा, ते अजून 'तुकाराम' बनूं शकले नाहीत. हा 'कला व चारित्र्या'चा प्रश्न आहे. कुलकर्णी तो डावलूं इच्छितात.

हे मतभेदाचे मुद्दे सोडले तर कुळकर्ण्यांची विवेचनपद्धति सफाईदार, मूलगामी आणि वस्तु–सत्याचा ठाव घेणारी आहे. त्यांचें 'तुकारामा'चें रसग्रहण फार चांगलें वठलें आहे. त्यांनी नवलेखनाबद्दल आपली वत्सल व पाठ थोपटणारी (पॅट्रोनाइझिंग) वृत्ति सोडून त्याबद्दल अधिक सूक्ष्म असें गुणदोषविवेचन केलें तर अधिक उत्तम होईल. त्यांचे टीकालेख वाचून आपण इंग्रजींतील आधुनिक टीकाकारांच्या तोडीचे विचार मराठींत वाचत आहोंत असें वाटतें. एक मोठी समाधानाची गोष्ट अशी की ते कोठेच खालच्या पातळीवर बोलत नाहीत. वामनमल्हारांनंतर विशुद्ध सत्यजिज्ञासेने साहित्यशास्त्राचा विचार करणाऱ्या या टीकाकारापासून मराठी वाङ्मयाच्या पुष्कळ अपेक्षा आहेत.

प्रभाकर माचवे

जगन्नाथपंडित,
एक ऐतिहासिक कादंबरी

[लेखक, श्री. गो. नी. दांडेकर, व प्रकाशक ग. ल. ठोकळ, ठोकळ प्रकाशन ६२ बुधवार, पुणें २; किंमत २–८–०]

जगन्नाथपंडित ही गो. नी. दांडेकर यांची ऐतिहासिक कादंबरी. कादंबरी ऐतिहासिक म्हणायला कारण, स्वतः लेखक तसं म्हणतात म्हणून आणि तींत जगन्नाथपंडित, शहाजहान, आसफखान, लवंगी, औरंगजेब, दारा, हीं पात्रें आहेत म्हणून. यापलीकडे या कादंबरीच्या ठिकाणीं ऐतिहासिक असं कांहीच नाही. जगन्नाथपंडित काव्येतिहासांतील एक वादग्रस्त प्रकरण आहे. परंतु कादंबरीची उभारणी करतांना श्री दांडेकरांनी सगळ्या गोष्टी आपल्या मनाप्रमाणें जुळवून घेतल्या आहेत, गृहीत धरल्या आहेत. त्याने दोन विवाह केले होते, तो लंपट होता, हेहि प्रवाद आहेत. पण अशा प्रकारची स्वभावरेखा निर्माण करायला दांडेकर तयार नाहीत. त्यामुळे जगन्नाथपंडित हे मुख्य पात्राला नांव न देतां कोणचंहि दिलं तरी चालू शकेल अशी परिस्थिति आहे. दांडेकरांनी जगन्नाथपंडित उत्तरेंत कां जातात याला कारण गंगा आणि हिमालय पाहण्याची त्यांना आत्यंतिक तळमळ असते हें दिलें आहे. पण जगन्नाथपंडितांना गंगा आणि हिमालयाचें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनावर झालेला काव्यात्म परिणाम कुठंच रेखाटण्याचा प्रयत्न केलेला नाही. ऐतिहासिक कादंबरी निर्माण करतांना विशिष्ट काळचं वातावरण कादंबरींत सारखं खेळतं ठेवावं लागतं आणि व्यक्तिरेखा स्पष्ट, सजीव कराव्या लागतात. पण याहि दृष्टीने दांडेकर मुळी प्रयत्नच करीत नाहीत. ही एक अत्यंत असमाधानकारक कादंबरी आहे. हें 'पद्मेचं' भावंड आहे.

बारा शास्त्रज्ञ—लेखक, श्री. श्री. म. माटे

श्री. माटे यांनी बारा शास्त्रांची ओळख करून दिली आहे. आर्किमेडीज, गॅलिलिओ, कोपर्निकस, न्यूटन, पाश्चर, मादाम यूक्री यांच्या जीवनचरित्रांची रूपरेखा देऊन त्यांच्या कार्याची माहिती करून दिली आहे. सगळ्यांच्याच जीवनामध्ये स्फूर्ति देण्याची शक्ति आहे. विद्यार्थ्यांना, आणि ज्या प्रौढांनी या शास्त्रज्ञांविषयीं वाचलेलं नसेल त्यांना पुस्तक उपयुक्त आहे. माटयांच्या लेखनशैलींतील एक महत्त्वाचा गुण सुबोधता; या त्रुटित चरित्रांमध्यें सर्वत्र आढळून येतो. त्या मानाने रसाळपणा मात्र कमी.

शीखांचे गुरु [ले०, र. ल. उपासनी, प्रकाशक, के. भि. ढवळे, श्रीसमर्थ सदन गिरगांव, मुंबई, मुल्य १४ आणे.]

शीखांचा इतिहास धैर्य, शौर्य, आत्मबलिदानानें ओतप्रोत भरलेला. त्या इतिहासाची ओळख श्री. र. ल. उपासनी यांनी विद्यार्थ्यांना करून दिली आहे. आरंभाला शीख गुरुंनी धर्मसमन्वयाचे प्रयत्न केले. पण विधर्मीयांच्या आततायी वृत्तीने, अत्याचारांनी शीख पंथ लढवय्या वृत्तीचा झाला. हें सगळें कार्य गुरु नानकापासून गुरु गोविंदसिंगापर्यंत निरनिराळ्या गुरुंनी केलें. शीख गुरूंच्या कार्याविषयी माहिती वाचत असतांना पंथाच्या इतिहासाचीहि ओळख होते. अत्यंत ठळक अशा घडामोडींची आणि व्यक्तींचीच माहिती देण्याचा पद्धतशीर प्रयत्न लेखकानें केल्यामुळे बालवाचकांकरितां पुस्तक चांगलं आहे.

व्याकरण मित्र

[लेखक, तु. ना. काटकर, प्रकाशक, रामचंद्र राजेश्वरराव पोटदुखे, गणेश मुद्रणालय, चांदा म. प्र. मूल्य १० आ.]

श्री. तु. ना. काटकर यांनी 'व्याकरण—मित्र' खास विद्यार्थ्यांकरिता तयार केलें. विषयाची मांडणी सरळ, सुबोध असल्यामुळे विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे.

गो. रा. दोडके

एक पत्र

['वनवासी सेवामंडळ, मंडला' या संस्थेचे संचालक श्री. नानासाहेब वापट यांनी आपल्या सहज सुंदर शैलीने, आपल्या एका अपूर्व अनुभवाचें उत्कृष्ट चित्रण प्रस्तुत पत्रांत केलें असून, तें वाचकांना आवडेल, अशी आशा आहे—संपादक, युगवाणी.]

श्री. संपादक, 'युगवाणी' यांस

स. न. वि. वि.

प्रत्येक साधारण व्यक्तीच्या जीवनांत अद्‌भुत घटना घडलेल्या असतात. तशा माझ्या आयुष्यांत घडल्या असल्यास नवल नाही. आपल्या यशस्वी आग्रहामुळे एका रोमहर्षण प्रसंगास वाचा फुटत आहे.

पाकिस्तान झाल्यावर माणसांची जी प्रचंड प्रमाणांत देवघेव झाली व ही देवघेव होत असतांना जे अनन्वित अत्याचार पंजाब व उत्तर हिंदुस्थानांत झाले ते ऐकून 'रेवायाः दक्षिणे तीरे' वसणाऱ्या सुखवस्तु लोकांच्या अंगावर शहारे येत.

भील सेवा मंडळ, दाहोद येथील दिवाळीचा पाहुणचार आटोपून मी परत जबलपुरास अलाहाबाद एक्स्प्रेसनें जात होतों. इटारसीला एका कौटुंबिक डब्यांत ऐसपैस जागा पाहून जाऊन बसलों. साडेतीन माणसें डब्यांत होतीं. आणखी कोणी येऊं नये म्हणून दार लावून आतून तें बंद केलें व एका बेंचावर अंग टाकलें. गाडी नरसिंहपुराकडे वायुवेगाने जात होती. तिच्या भभकाऱ्याच्या गोंगाटांत गुंगत पडलों होतों इतक्यांत—

शेजारच्या डब्यांत दंगामस्ती चालू झाल्याचा भास झाला. मी डब्याच्या लाकडी भिंतीस कान लावले. आता त्या भिंतीसहि लाथाबुक्यांचा प्रसाद मिळावयास प्रारंभ झाला होता. माझा सोबती 'सागर'ला जाणारा एक कृषि जमादार होता. त्याची म्हातारी आई व धाकटी वहीण दोघीहि धावरून उठल्या.

आम्ही खिडकी उघडली मात्र तोंच 'अरे बाप ! मर गया रे ! कोई बचाव ! बचाव !' असे आर्त स्वर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कानीं आले. खिडकींतून एक हाताचा पंजा खिडकी धरण्याचा प्रयत्न करीत होता. ही काय भानगड आहे आम्हांस कळेना. चालत्या गाडींत कोणी डाकू शिरलेला. शेजारच्या डब्यांत शिरलेल्याप्रमाणं याहि डब्यांत शिरण्याचा प्रयत्न कोणी करीत आहे काय ?

त्या हातावर फटकारा मारून त्याला खाली पाडावं असा विचार मनांत चमकून गेला पण दुसऱ्याच क्षणीं आंतून आवाज आला, 'यह डाकू हो या शरणार्थी, उसे गिरनेसे बचाही लेना चाहिये.' कांही कळेना. तो हात तेथेंच घुटमळत होता. किंकाळ्या असह्य होत होत्या. जीवावरच्या प्रसंगानं क्षणभर हतबुद्ध झालेल्या माझ्या शरीरांत व अन्तःकरणांत एकाएकी जोम संचरला. हा हात कोणाचाहि कां असेना, तो चालत्या गाडीच्या बाहेरच्या माणसाचा आहे. तो माणूस खाली पडून दगावणार असल्यास त्याला ओढून घेतलेंच पाहिजे असा विचार करून मी दोन्ही हातांनी तो हात घट्ट धरला. धरलेल्या हाताच्याच आधारावर एक शरीर बाहेर लोंबकळत आहे व दुसऱ्या हाताने खिडकी धरण्याचा प्रयत्न करीत आहेसें वाटलें. माझ्या साथीदारानं तो दुसरा हात पटकन् पकडला व आम्ही दोघांनी भीम पराक्रमाने एका 'लंगड्या' यवनास आंत पायावर उभें केलें. त्याचा नवा शर्ट फाटलेला होता. गोरा चेहरा ओरबाडलेला होता. डोळ्यावर मृत्यूच्या दाढेंतून परत आल्याची धुंदी होती. थंडीचे दिवस असूनहि त्याचें शरीर घामाने थोयंबलें होतें.

आपण बचावलों हें पाहतांच क्षणार्धांत स्वतःस सावरून तो ओरडला, 'दार उघडा. त्या बदमाशास पकडा.' आता आमच्या दारावर ठोठावण्यास सुरुवात झाली होती. आपला डाव फसला हें पाहून शेजारच्या गुंडांची वक्रदृष्टि आमच्यावर वळली होती. नाना फडणवीसाच्या अविर्भावाने दार न उघडतां गाडीची साखळी ओढली. गाडी थांबून आमचे डब्याशीं लोक जमल्यावर आम्ही दार उघडलें. बदमाश फरार झाले होते. जमलेल्या रेल्वे व पुलिस अधिकाऱ्यास आम्ही त्या माणसाची हकीगत सांगितली. भिंती आड झालेला प्रकारहि त्याने निवेदन केला.

तो स्वतः गुप्त पोलिस खात्यांतला. दिवाळीची सुटी आटपून परत कामाच्या गांवीं जात होता. सदऱ्याच्या वरच्या खिशांत कांही नोटा होत्या. जागा पुष्कळ म्हणून तोहि बेंचावर आडवा झाला व डोळा लागला असेल नसेल तोंच कोणीतरी त्याचे छातीवर येऊन बसलें व त्याचे खिशांतल्या नोटा ओरबाडून काढून त्याचा गळा दावूं लागलें. त्याने वरच्या माणसास कसेंबसें दूर लोटलें. इतक्यांत दुसरा मनुष्य त्याचे अंगावर धावला. दोघांनी मिळून त्याची कणिक तिंबून त्यास खिडकींतून गाडी बाहेर फेंकण्याचा प्रयत्न केला. पण त्याच क्षणीं शेजारच्या उघड्या खिडकींत मदतीच्या याचनेसाठी गेलेला त्याचा हात कोणीतरी पकडला व त्यास जीवदान दिलें.

बदमाश हातीं लागले नाहीत याबद्दल तो माझ्यावर रागावला. तुम्ही दार कां उघडलें नाही ? गाडी थांबविण्याची घाई कां केलीत ? या प्रश्नांना मी काय उत्तर देणार ? मी मनांत म्हटलें, 'बाबारे' तुला वर ओढतांना माझ्या अंगांत देव संचरला होता. तुझें रक्षण करावयाचें म्हणून तो अंतर्धान पावल्यावर आत्मरक्षणार्थ साखळी ओढल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

चोरांनी हातावर तुरी दिल्या पण पोलीस आमच्या पाठीमागे लागले. जबानी देतां देतां मी कंटाळून गेलों. जबलपूरच्या स्टेशनावर तर आमच्या डब्यास पोलिस पार्टीने गराडा घातला. गाडी लेट झाली होती. आसपासचे उतारू पोलिसांनी वेढलेल्या आमच्या अपराधी शरीराकडे संशयाने पाहून खरी गोष्ट जाणण्याच्या भानगडींत न पडतां अर्थपूर्ण मान हलवून तिरस्कारयुक्त कटाक्ष फेंकून आपापल्या घरीं जाण्याची घाई करीत होते.

थंडींत तासभर काकडत उभे राहून शेवटीं पोलिस अधिकाऱ्यांची विनवणी केली की मला आता घरीं जाऊं द्या. हा पत्ता देतों त्या पत्यावर मला भेटा.

शेवटीं कष्टानं सुटका झाली. वस्तुस्थिति कळलेल्या दोघाचौघांच्या आदरयुक्त चेहऱ्याकडे बघून माझा सर्व शीण गेला व मी घरीं जाऊन सुखानं झोप घेतली.

आपला

नाना बापट

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देवाच्या द्वारीं (पान ८ वरून पुढें चालू)

(विठ्ठलनामाचा गजर; टाळ, मृदंगाचा ध्वनि)

सारे जण—सदा माझें डोळां, जडो तुझी मूर्ती ।
रखमाईच्या पति, सोयरिया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देई मज प्रेम, सर्वकाळ ॥
विठो माउलीये, हाचि वर देई ।
संचरोनि राही, हृदयामाजीं ॥
तुका म्हणे कांही न मागे आणिक ।
तुझे पायीं सुख, सर्व आहे ॥

(भजन चाललें असतांना मध्येच सारजेचा, कधी चितामणाचा, कधी पांडुरंगाचा आवाज ऐकूं येतो. 'पुंडलीकवरदे हारिविठ्ठल'चा त्रिवार जयघोष. आरतीचें तबक घेऊन गदाधर येतो, लोक पैसे टाकतात.)

गदाधर—काय रे चितामण, तूं येथें कसा उभा या महाराजवळ ?

चितामण—हीच माझी योग्य जागा आहे. (पांडुरंग आरतींत एक रुपया टाकतो.)

गदाधर—एक रुपया कुठून आणलास रे पांड्या ?

चितामण—नीट बोल, गदाधर.

गदाधर—अरे चल मास्तरड्या, (लोकांत थोडी कुजबुज, गडबड)

शास्त्रीबुवा—काय रे, गदाधर, कसचा गोंधळ आहे ?

गदाधर—कांही नाही. (सारजेला हळूच) सारजे, आज रात्रीं दहा वाजतां...(सारजा बोलत नाही, तबकांत दोन रुपये टाकते.)

शास्त्रीबुवा—चला गदाधर तीर्थप्रसादासाठी येऊं दे लोकांना (शास्त्रीबुवा स्वत: तीर्थप्रसाद देतात. लोक प्रसाद घेतात पण तिथेंच उभे राहतात.)

शास्त्रीबुवा—काय हो 'दीनबंधू' प्रसाद मिळाला ना ? मग येथे गाभाऱ्यांत गर्दी कशाला ? खंडोबा यांना एकेकाला जायला सांग रे.

खंडोबा—व्हय जी.

दीनबंधु—आम्ही येथेच उभे रहाणार.

सिंहप्रताप—वाटेल तेवढा वेळ उभें राहूं.

शास्त्रीबुवा—प्रसाद मिळाला सगळयांना.

सारजा—(पुढे होऊन) मला द्या प्रसाद !

गदाधर—थोडा जास्त प्रसाद देऊं बाबा ?

शास्त्रीबुवा—दे, दे. आणखी कोण उरलं ?

(पांडुरंग, सख्या व चितामण पुढे येतात.)

शास्त्रीबुवा—पांडुरंग, तूं आधी बाहेर हो, आंतल्या गाभाऱ्यांत तूं यावयाचें नाही ! सख्या, तूं मागें सर, चितामण तूं, पुढे ये व घे प्रसाद.

सख्या व पांडुरंग } मला प्रसाद द्या.

शास्त्रीबुवा—देवाचा प्रसाद महारांसाठी नसतो.

दीनबंधु—शास्त्रीबुवा, शब्द संभाळून बोला. "हरिजन" म्हणा.

ब्रह्मशक्ति—महात्मा गांधींनी या महारड्यांना डोक्यावर चढवून ठेवलें आहे.

(लोकांत गडबड)

शास्त्रीबुवा—महार ते महार, त्यांना कसला मान ? चितामण तूं प्रसाद घे.

चितामण—यांना प्रसाद मिळाल्याशिवाय मी प्रसाद घेणार नाही.

शास्त्रीबुवा—मी जिवंत आहे, तोंपर्यंत त्यांना प्रसाद मिळणार नाही ! पांडुरंग तूं आधी बाहेर हो.

पांडुरंग—नाही, मला विठ्ठलाचा प्रसाद द्या; माझी विनंति ऐका.

शास्त्रीबुवा—खंडोबा, या दोघांना हात धरून बाहेर काढ; गदाधर, गोमूत्र घेऊन ये, देऊळ भ्रष्ट झालें, देव भ्रष्ट झाले.

सख्या—खंडोबा, खबरदार.

पांडुरंग—मला विठ्ठलाचा तीर्थप्रसाद द्या, माझी नम्र विनंती ऐका.

सोमण वकील—शास्त्रीबुवा, कायद्यानं त्यांना हक्क मिळाले आहेत.

शास्त्रीबुवा—सनातन धर्म पुरातन आहे !

सिंहप्रताप—त्यांनी काय पाप केलें आहे ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शास्त्रीबुवा–ते चांडाळ कुळांत जन्मले आहेत !

चिंतामणः–ही सारजा सुद्धा त्याच कुळांतली आहे, तिला तुम्ही प्रसाद कसा दिला ?

शास्त्रीबुवा—ती देवस्थानाला सालीना हजार रुपये देते.

चिंतामण—म्हणजे तुमच्या देवाला धन पाहिजे, मग तें कोणाचेंहि असलें तरी चालेल !

पांडुरंग—मला विठ्ठलाचा तीर्थप्रसाद द्या, गरीबाची नम्र विनंती ऐका.

शास्त्रीबुवा—नाही, त्रिवार नाही, खंडोबा, तूं बघतोस काय ?

सख्या—पांडुरंगाने आरतींत रुपया टाकला, तो घेतांना तुम्हाला—

शास्त्रीबुवा—गदाधर, तो रुपया फेक त्याच्या अंगावर. (गदाधर रुपया फेकतो, तो पडतो खंडोबाच्या पायाजवळ.)

पांडुरंग—(नम्रपणें) मला तीर्थप्रसाद द्या, मी तुमच्यासारखाच माणूस आहे, तुमच्यासारखीच मला विठ्ठलाने वाचा दिली आहे, भक्ति दिली आहे.

चिंतामण—तुमच्यापेक्षा तो कशांत कनिष्ठ आहे ? बारा वर्षे त्याने केलेली तपश्चर्या या ब्रह्मवृंदापैकी, एकाने तरी केली आहे काय ? तुमचा हा गदाधर! त्याला गीतेंतला एक तरी श्लोक नीट म्हणतां येतो का, गणिकेच्या घरून परत आल्यावर त्याचा स्पर्श तुम्हाला, तुमच्या देवाला—

गदाधर—तूं खोटें बोलतोस.

चिंतामण—व ही गणिका. सहस्त्र जनांची विषयवासना झालेल्या या स्त्रीला तुम्ही दुप्पट प्रसाद देतां व हा पांडुरंग कर्माने, विद्येने, आचरणाने तुमच्या मुलापेक्षा शंभरदा श्रेष्ठ आहे, त्याला तुम्ही प्रसाद देत नाही, देवाचें जवळून दर्शन घेऊं देत नाही.

सख्या—खंडोबा, पायाच्या बोटाने तो रुपया उचलूं नकोस, असूं दे तसाच !

सारजा—शास्त्रीबुवा, मला हा प्रसाद नको.

गदाधर—अग हें काय, देवाचा प्रसाद, परत करतेस ? वेडी !

पांडुरंग—मला तीर्थप्रसाद द्या, तुम्हाला देवानें जी भक्ति दिली आहे तीच मलाहि दिली आहे, विठ्ठलाची मूर्ति बघून तुम्हाला जो आनंद होतो, तोच मलाहि होईल. संस्कृत काव्य वाचून तुमचीं मस्तकें उन्मत्त होतात तसेंच मलाहि वाटतें, माझी अपंग जीभ आधी संस्कृत शब्दामुळे वळेना, पण श्रीगुरूच्या कृपेने स्वच्छ व मधुर झाली आहे ! बघा.

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।।

शास्त्रीबुवा—गीर्वाण भाषेचा शूद्राकडून उच्चार !

ब्रह्मशक्ति—देवांचा अपमान, देवांची विटंबना !

कौसल्या—(आंत येऊन) अरे, पांडुरंग, कुठेरे आहेस तूं ? चल, चल घरीं.

दशरथ—(आंत येऊन) अरे देवानेच आपणाला असा जन्म दिला. तूं का उलटा वागतोस ?

पांडुरंग—थांब मा, थांबा बावा, तुक्याच्या अभंगांत, या विठ्ठलाचें वर्णन वाचलें, काव्यग्रंथांत मीं देवाचें सुंदर वर्णन वाचलें. तें वर्णन वाचून विठ्ठलाला डोळे भरून पाहण्याची मला तीव्र इच्छा झाली. पतित म्हणून, चांडाळ म्हणून, मला लोकांनी दूर ठेविलें पण आता धीर धरवत नाही, मला एकदा तें सावळें गोजिरें रूप जवळून बघूं द्या. एकदाच, फक्त एकदाच... (तो पुढे सरकतो. देवासमोर गुढघे टेकतो व मूर्तीच्या पायाला हात लावतो.)

शास्त्रीबुवाः–खंड्या कुठे आहेत तुझे सायीदार !

खंडोबा—ए गोम्या, ए सोम्या, काठ्या आणा.

दशरथ—पांडुरंग, बाहेर ये, बाहेर ये. (गडबड, गोंधळ)

कौसल्या—माझा मुलगा, त्याला मारलें, मारलें त्याला ! !

चिंतामण—खंड्या, आधी माझ्या शरीरावर प्रहार कर !

(पांडुरंगाच्या अंगावर निजतो : एकच कोलाहल)

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(७)

(चिंतामणचें घर : ओटीवर सख्या उभा आहे. सकाळची वेळ)

चिंतामण—काय म्हणतात रे सख्या, आता तरी येताहेत का ?

सख्या—आता दहा मिनिटांत येतीलच !

चिंतामण--बरें, तूं आता देवाकडे जा, व पांडुरंगाची काय स्थिति आहे ती पाहून मला सांगावयाला ये, जा लवकर. (सख्या जातो) हें बघ ताई, झालें तुझें सामान बांधून ? तुला आधीं स्टेशनवर पोचवितों, मी पुण्याला मावशीला पत्र लिहिलेंच आहे.

सीता--दादा, मला राहूं दे येथेंच ! तुला एकटा सोडून मी जाऊं कशी ? तुझें खाणेंपिणें कोण करील ? ब्राह्मणांनी आपणाला वाळींत टाकलें आहे, त्याचें मला दुःख नाही पण तुझें कसें होईल इथे ?

चिंतामण—या प्रकरणामुळे तुझें डॉक्टर जोशांच्या मुलाशीं लग्न होणार होतें तें आता होणार नाही, याचें मला जास्त वाईट वाटतें !

सीता--माझ्या लग्नाचें काय घेऊन बसलास, तुझी सोन्यासारखी नोकरी गेली त्याचें मला जास्त वाईट वाटतें.

चिंतामण--ताई, तुला एक प्रश्न विचारूं ? हें जें कांही घडून आलें त्याबद्दल तूं मला दोष तर देत नाहीस ना ? स्वत:ला कष्ट झाले म्हणजे माणसाला न्याय, समता, सत्य कांही दिसत नाही, म्हणून म्हणतो.

सीता–नाही रे दादा, मी स्त्री आहे म्हणून तुला असें वाटत असेल, पण तुझ्याबरोबर उद्यापासून मलाहि देवाच्या दारीं सत्याग्रह करूं दे ! दशरथ दुसऱ्या दिवशीं हाय खाऊन स्वर्गांत गेला, पांडुरंगाचें घर लोकांनी जाळलें ! मला किती वेदना होतात तें मी कसें सांगूं ? असें वाटतें, पुष्कळदा असें वाटतें की शास्त्रीबुवांचें घर जाळून टाकावें. मग मला पकडून नेले तरी चालेल.

चिंतामण--(सख्याला येतांना पाहून) तूं आता सामान तयार ठेव, जा ! काय रे सख्या ?

सख्या—तसाच आहे, बाप मेल्यापासून जास्त अबोल झाला आहे. नेहमीप्रमाणें गीतेंतले चार श्लोक वाचून त्याने प्रारंभ केला उपासाला. देवळासमोर खूप गर्दी आहे लोकांची त्याला बघण्याकरता ! तुम्ही उद्यापासून त्याच्याबरोबर उपवास करणार आहांत, हें मी त्याला सांगितलें तेव्हा असें करूं नकोस असा त्याने निरोप पाठविला आहे तुम्हाला. (थोडा वेळ थांबून) ताई काय म्हणत होती शास्त्रीबुवांच्या घराबद्दल ?

चिंतामण—कुठे ? कांही नाही ! तूं जा आता कौसल्येकडे. ती एकटी असेल. बिचारी ! या मंडळी, या. तुमचीच वाट बघत होतों, बसा ! मग तुम्ही काय मदत करणार सांगा, माझ्याकरिता नव्हे, तत्वाकरिता. तुम्ही नेहमी तत्वाच्या गोष्टी करतां संपादक महाराज, म्हणून विचारतों.

दीनबंधू-मला वाटत होतें मी कांही करूं शकेन म्हणून ! मंदिरांत तो प्रकार झाल्यावर पांडुरंगाची बाजू घेऊन "ब्राह्मणांची मिरासदारी नष्ट करा" हा अग्रलेख लिहिला, त्याच्या हजार प्रति लोकांनी लुटल्या, व देवळासमोर जाळल्या.

चिंतामण–आणि तुम्ही सिंहप्रताप कवी, आता हा सुरासुरांचा तुंबळ संग्राम चालला आहे. मग फुंका तुमची तुतारी व चला देवांच्या मदतीस !

सिंहप्रताप–मला क्षमा करा, मी त्या दिवशीं पांडुरंगाच्या डोक्याला माझा रुमाल बांधला व त्याला उचललें तेव्हापासून माझ्या घरासमोर तो खंडोबा उभा असतो, माझ्याकडे कोण येतें कोण जातें या पाळतीवर ! भाऊबिजेच्या दिवशीं माझी वहीण सुद्धा आली नाही.

चिंतामण–आणि तुम्ही सोमण वकील, बहुजनसमाजाचा उद्धार करण्याची आलेली ही संधि—

सोमण वकील–वा चिंतामणराव, कसला घेऊन बसला उद्धार, वकीलींत चार पैसे जास्त मिळावेत, म्हणून हीं सोंगें करावीं लागतात, झालें !

चिंतामण--ठीक आहे, या आता, आणि पुन्हा स्वत:ची अशी वंचना करून घेऊं नका. तुमच्या वर्तमान-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्राचें आता नांव बदला, संपादकमहाशय. कविमहाराज, केशवसुताला आता विश्रांति घेऊं द्या, व पुन्हा रंजले गांजले यांच्या गोष्टी बोलूं नका. सोमण वकील, सगळ्या गावाचा मी वैरी बनलों आहेच. तुम्हाला मित्र समजत होतों, पण माझ्या भाषणानें तुम्हीहि मला शत्रू समजाल यापुढे ! हा शकुन चांगला आहे आजचा ! बरें, या—

शूरांनो या त्वरा करारे ।
समतेचा ध्वज उंच धरा रे ॥

(ते जातात.)

कोण वाजवतें आहे दाराची कडी ? (बाहेरून स्त्रीचा आवाज ' मी येऊं कां आंत ?'

चिंतामण—कोण ? (दार उघडून) तुम्ही, सारजाबाई !

सारजा—येऊं कां आंत ?

चिंतामण — या, या.

सारजा—तुमच्याकडे आलें; याबद्दल रागावूं नका ! माझें एवढेंच मागणें आहे की मला या कार्यांत कांही मदत करतां येईल का, मला जें कांही करतां येईल ते करण्याची मला संधि देतां का ? माझ्यावर तुमचे उपकार होतील ! तुम्ही बोलत कां नाही ?

चिंतामण—ताई, यांना पाट दे बसायला. थोडे गूळपाणी करून आण.

सारजा—नको, नको मला कांही, मी अशीच बरी आहे उभी !

सीता—(पाट ठेवते) तुमच्या रूपाचें मी पुष्कळ ऐकलें होतें, सारजाबाई. या बसा. (हात धरून खाली बसविते.) मी आता आलें हं !

सारजा—पांडुरंगाची आई घरीं एकटी आहे, तिला माझे घरीं आणून ठेवावें असें मला वाटतें.

चिंतामण—आवडली मला ही कल्पना, पण ती येईल का ?

सारजा—तुम्ही सांगाल तर येईल. (थोडा वेळ थांबून) व- व –

चिंतामण—सांगा ना मोकळेपणानें !

सारजा—माझा राग येईल.

चिंतामण—कळूं तर द्या मला.

सारजा—तुमची नोकरी गेली म्हणें; माझ्या हातून तुमची कांही सेवा होईल काय ?

सीता—घ्या हें गूळपाणी, सारजा बाई.

सारजा—(सीतेचा हात धरत) बसाना माझ्याजवळ. सीताबाई तुमच्या हातांत या माझ्या बांगड्या...

सीता—तुमच्या या हिऱ्याच्या बांगड्या...

सारजा—हो, काय झालें त्याला, सीताबाई एवढे माझें ऐकाच ! आमचा सारा जन्म असा मातींत जातो, एक तरी चांगलें काम मला करूं द्या.

चिंतामण—हें बघा सारजाबाई, मला सध्या कांही नको, तशी मला गरजच पडली तर मी स्वतः येऊन तुम्हाला मागेन. आता झालें ना समाधान ?

सारजा—मला थोडें तरी तुमचें काम करूं द्या हो ! त्या दिवशीं पांडुरंगावर काठी उगारली, तेव्हा पहिला वार तुम्ही आपल्या अंगावर घेतला, त्या जखमेवर मला हात तरी फिरवूं द्या, तेवढाच मला आनंद होईल !

चिंतामण—तुमच्या सहानुभूतीबद्दल मी तुमचा ऋणी आहे. सारजाबाई, देव तुम्हाला सुबुद्धी देवो ! मी येऊं घरापर्यंत पोचवायला ?

सारजा—नको, मी जाते.

(८)

(शास्त्रीबुवांचा वाडा, त्याच दिवशीं दुपार)

गदाधर—बाबा, आज चार दिवस झाले सत्याग्रहाला. उद्यापासून चिंतामण करणार आहे सत्याग्रह पांड्याबरोबर ! गावांत मात्र जास्त खळबळ उडेल ! लोक तुम्हाला शिव्या देतात, बाबा.

शास्त्रीबुवा—मला कसलेंहि भय नाही.

गदाधर—पण लोकमत हळुहळु उलट दिशेनें जात आहे बाबा ! तुम्ही जें जें करतां तें तें तुमच्या अहिताचें आहे ! दोर फार ताणला तर तुटेल आता !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शास्त्रीबुवा—हें बघ, सरकारी अधिकारी आपल्याकडचे आहेत.

गदाधर—तरी पण समाज जर खवळला तर ?

शास्त्रीबुवा—तर काय ?

गदाधर—आपण जिवंत तरी राहूं का ? उद्या त्या सख्याने आपल्या घराला आग लावली तर ?

शास्त्रीबुवा—मग काय करूं म्हणतोस ?

गदाधर—उद्या संध्याकाळीं आरती झाली म्हणजे कोणी नसतांना पांडुरंगाला एकट्याला आंत बोलवा, त्याला प्रसाद द्या, व विठ्ठलाचें दर्शन घेऊं द्या.

शास्त्रीबुवा—मला थोडा विचार करूं दे. (खंडोबा धांवत येतो.) काय रे खंडोबा ?

खंडोबा—मी बूडालों, माझ्या शेतांत रात्रीं चोर घुसले व माझे गाय व बैल घेऊन गेले. आता मला सख्या भेटला. तो विस्तवासारखे डोळे फाडून माझ्याकडे पहात होता. मला वाचवा शास्त्रीबुवा !

शास्त्रीबुवा—वरें तूं जा, तुझीं वायकापोरें घेऊन माझ्या वाड्यांत ये. (खंडोबा जातो.)

गदाधर—मी म्हटले होते ना, आता एकच मार्ग आहे !

शास्त्रीबुवा—कोणता ? सांग लवकर.

गदाधर—चिंतामणला एक पत्र लिहा की...

शास्त्रीबुवा—काय लिहूं सांग.

गदाधर—मी सांगतो तसें लिहा. हा घ्या कागद.

(९)

(सारजा नायकिणीचा वाडा, मोठें दालन)

सारजा—तुम्ही जा आता कौसल्याबाई व निजा सख्या तूं सुद्धा येथेच रहा. मला तुझी पुष्कळ मदत लागेल.

कौसल्या—माझ्या चामड्याचे जोडे तुमच्या पायांत घातले तरी—

सारजा—आता पुरे कौसल्याबाई. माझी आई लहानपणींच वारली. तुम्हीच आता माझी आई.

सख्या—बाहेर गदाधरशास्त्री आले आहेत.

सारजा—त्यांना सांग मी आजकाल परपुरुषाला भेटत नाही.

गदाधर—(बाहेरून) मला फक्त पांचच मिनिटे दे सारजे, तुला पांडुरंगाविषयीं कांही सांगावयाचे आहे.

सारजा—वरें, आण त्यांना.

गदाधर—(आंत येऊन) मला तुझ्याशीं एकांतांत बोलावयाचे आहे. ह्या लोकांना बाहेर जायला सांग. (कौसल्या, सख्या जातात.) हें बघ सारजे, तुझी किंमत द्यायला मी तयार आहे. तूं असा भेदभाव करावा हें मोठें आश्चर्य आहे.

सारजा—अशा गोष्टींत आता माझे मन नाही. मी शृंगारसाज सोडला, मी एकदांच जेवते; वेणींत फुलें घालीत नाही. खाली घोंगडीवर निजते.

गदाधर—तुझें त्या पांडुरंगावर मन जडलें आहे का ? त्याची आई इथे दिसते. तूं मघा चिंतामणाच्या घरीं गेली होतीस ना ? तूं कोठे जातेस, तुझ्या घरीं कोण येतें हें मला समजतें, वरें का ! विसरूं नकोस हा गदाधरशास्त्री आहे, पंढरपुरांतले सारे पुंड मला घावरतात.

सारजा—वरें मग ?

गदाधर—मग काय ? मध्यरात्र उलटल्यावर मागच्या दरवाज्याने येऊं का ? तुझ्यासाठीं एक सुंदर शालू आणला आहे. (तिच्या खांद्यावर हात ठेवीत) तुला नेसवून बघूं दे.

सारजा—(शांतपणे) मला हात लावूं नका. कोण आहे रे तिकडे ? यांना दरवाजा दाखव.

गदाधर—पूर्ण विचार करून बोल, पांडुरंगाला कैदेंत पाठवावयाचे आहे का ?

सारजा—कैदेंत ?

गदाधर—की त्याला विठ्ठलाचें दर्शन घडवावयाचे आहे.

सारजा—व प्रसाद घ्यावयाचा आहे.

गदाधर—मी तें घडवून आणतो.

सारजा—(आनंदाने) खरें ? पण कसें ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गदाधर—तें माझ्याकडें सोपव, बावांच्या अनुमतीचें मजजवळ एक पत्र आहे, दाखवूं ? हें बघ

सारजा—मग त्यांना प्रसाद कां देत नाही, देवाला जवळून कां पाहू देत नाही ?

गदाधर—माझी एक अट आहे. तुला माहीत आहे ती अट ! तूं हो म्हण म्हणजे झालें. शांततेला धोका आहे म्हणून उद्या पोलीस पांडुरंगाला पकडून नेतील. त्याच्या आधी माझी इच्छा पूर्ण झाली तर ?

सारजा—शास्त्रीबुवांचें तें पत्र मला वाचून दाखवा. तें खरें आहे ना ?

गदाधर—काय सारजे, माझ्यावर विश्वास नाही तुझा ? इतका का मी लुच्चा आहे ? तुझें उत्तर उद्या दुपारपर्यंत मला कळव. ही माझी अंगठी ठेव. ती माझ्याकडे सख्यावरोबर पाठव, म्हणजे—

सारजा—म्हणजे काय ?

गदाधर—म्हणजे मी समजेन. (जोराने हसतो) समजलें नाही तुला ? उद्या चार वाजेपर्यंत. चार—

(१०)

दुसरा दिवस, सकाळ (विठ्ठलमंदिराच्या द्वारीं : पांडुरंग वसला आहे. चिंतामण येतो)

पांडुरंग—तूं कशाला आलास चिंतामण? तूं आपल्या वहिणीला पुण्याला पाठविलेंस हें खरें कां ?

चिंतामण—हो, व आजपासून मी तुझ्यावरोबर येथे वसणार आहे.

पांडुरंग—काय म्हणावे तुला ?

चिंतामण—मलाहि थोडें मतस्वातंत्र्य दे. वरें, तें जाऊ दे ! कोणी डॉक्टर आला होता कां तुझी कपाळावरची जखम बांधावयाला ? सारे मित्र आहेत वेटे. त्यांचा धर्म सुद्धा ते विसरलेत.

पांडुरंग—सकाळीं सारजाबाई आल्या होत्या माझ्या भेटीला.

चिंतामण—अनपेक्षित दिशेकडून देव धावत येतात. मला वाटत होतें की सारे जग दानवांनी भरलें आहे म्हणून. पण नाही, अजून देव जिवंत आहे.

पांडुरंग—यें, वैस मजजवळ. तूं आलास, माझा वेळ तरी आता बरा जाईल.

चिंतामण—मी कांही वाचून दाखवूं तुला ? गीतेंतला चांगला भाग-विश्वरूप दर्शनाचा ?

पांडुरंग—असें तरी दर्शन घडेल मला परमात्म्याचें.

चिंतामण—(वाचतो) ऐक तर,

किरीटिनं गदिनं चक्रिणं च
तेजोराशिं सर्वतोदीप्तीमन्तम्
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ता-
द्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥१॥

अनादिमध्यान्तमनन्तवीर्यं
अनन्तवाहुं शशिसूर्यनेत्रं
पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं
स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥२॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराण-
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ॥
वेत्तासि वेद्यं च परं च धाम ।
त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥३॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च
नमोनमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥४॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः
मय्यर्पितमनोवुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥१॥
यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः ॥२॥

(११)

(सारजेचा वाडा : दुपारचे वारा)

सारजा—कौसल्यावाई, तुम्ही जेवून घ्या, मला आज जेवायचे नाही.

कौसल्या—तुमच्याशिवाय मी जेवूं ? माझा पांडुरंग कांही घेत नाही. मला अन्न गोड कसें लागेल ? तुम्ही जेवावें म्हणून मी चार घास घेत असे. पण आता तुम्हीच........(रडते)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सारजा—सख्या, तुला वाचतां येते ना रे, आम्हाला पोथी वाचून दाखव एखादी. त्यामुळे मनाला धीर तरी येईल.

सख्या—तुम्हीच एकादें देवाचें भजन म्हणा ना, तुमचें गाणें मला ऐकावयाचें आहे.

सारजा—आज नको रे, आज मला बरें वाटत नाही. तूंच आम्हाला कांही चांगलें वाचून दाखव. देवघरांत पुष्कळ पोथ्या आहेत. आण एखादी न् वाच.

सख्या—(वाचतो) माया मोह धरून । कोणी कराल तरी रुदन । तरी मी जाईन उठोन । सत्व घेवून तुमचें ॥१॥ अवश्य म्हणोनि पतिव्रता । उभी ठाकोन पाहे निजसुता । म्हणे बाळा चिलया गुणवंता । खेळायासी गेलासी कोठे ॥२॥ तुजलागीं खोळंबला अतित । माउली माझी ये धावत । ऐसें ऐकतां अकस्मात । बाळ आला बाहेरुनि ॥३॥ अतितासी करूनी नमन । मातांपितयांचे धरी चरण । माता म्हणे तुझें पिशीत दान । अतित मागती राजसा ॥४॥ बाळ बोले स्नेहेंकरून । हा देह म्यां केला शिवार्पण । अतित होतां तृप्त पूर्ण उभा रमन संतोषेल ॥५॥

(१२)

(दुपारीं चारचा सुमार; विठ्ठलमंदिरासमोर लोकांची गर्दी; पांडुरंग दारांत बसला आहे.)

चितामण—म्हणून माझें म्हणणें असें आहे की साऱ्या मानव जातीसाठी देवानें निर्माण केलेल्या वस्तूंवर कोणा एका व्यक्तीची किंवा एका जातीची मिरासदारी नाही. ही पृथ्वी, हा फुलांचा सुगंध, प्राणहिता सगळ्यांसाठी आहे. या पुष्पांचा वास फक्त ब्राम्हणांसाठी आहे असें कोण कसें म्हणेल ? पण मिरासदारी अशी विचित्र वस्तू आहे की तिचें वारें एकदा शिरलें की हें प्राणहितेचें पाणी आम्हां ब्राह्मणांचें, ही पृथ्वी आम्हां श्रीमंतांची, हा देव सुद्धा आम्हा ब्राह्मणांचा असे शब्द ऐकू येतात ! हा शुद्ध अन्याय आहे व तो दूर करण्यासाठी आम्ही भांडणार ! मला आश्चर्य असें वाटतें की आपण स्वतःला एका देवाचीं लेकरें असें म्हणवतो पण तसें वागत मात्र नाही. ज्या विठ्ठलाचे नांवावर या गरीब पांडुरंगाचा छळ होत आहे तो पंढरीनाथ मात्र महाराचें सोंग घेऊन भक्तांच्या भेटीला गेला. शूद्र, चांडाळ, वेश्या, पतित या साऱ्यांना परमेश्वराने भेट दिली असें कीर्तन आपण आनंदाने ऐकतों, पण या पांडुरंगाला तुम्ही प्रसाद देत नाही, देवाचें दर्शन घेऊं देत नाही. (रागानें) जणू काय हे ब्राह्मण म्हणजे देवाचे मालकच.

एक आवाज—(हळूच पण ऐकूं येईल असें) हा आम्हाला शास्त्र शिकवितो, हा कालचा मुलगा.

चितामण—(त्याच आवाजांत) आणि हा पांडुरंग किती तरी ब्राह्मणांपेक्षा जास्त विद्वान, जास्त पवित्र व शीलवान आहे. त्याचे मी पाय धरावे इतका तो श्रेष्ठ आहे. पण मौज बघा की, मंदिराच्या गाभाऱ्यांत सख्याच्या बापाला तुम्ही येऊं देतां, वेश्येकडे जाणारा पुजारी तुम्हाला पसंत पडतो, पण हा बुद्धिवान, चारित्र्यसंपन्न, पापभीरु पांडुरंग तुम्हाला नडतो. तुमच्या दंभाची, तुमच्या सोवळ्या मनाची मला चीड येते, मंदिरांत जातांना हीं फुलें, तांदूळ, पैसे, त्यांच्यासमोर टाकतां कशाला ? तुमचे तुम्हीच ते घेऊन जा व शास्त्रीबुवांच्या पायावर घाला, म्हणजे वेश्येशीं विलास करणारा आणखी एक पुत्र निर्माण करण्याची त्यांच्यात शक्ति येईल.

दुसरा आवाज—हें काय बोलणें? ही काय भाषा झाली ?

चितामण—(चिडून) तुम्हाला ऐकावयाचें नसेल तर तुम्ही घरी जा, इथे येतां कशाला ? आम्ही काय पिंजऱ्यातले प्राणी आहोत ? कां तुम्ही मजा बघण्याकरितां येथे जमावें ? भित्रे, दांभिक, षंढ, साऱ्या जगाला बंधुभावाचा धडा शिकविणारा तो दीनबंधु, तुतारीने गगनाला भेदून टाकणारा तो कवि, दलित वर्गाच्या उद्धाराला निघालेले ते बुद्धदेव, एकाचें तरी तोंड दिसतें कां ? तुमचें पोट तुमच्या आड येतें, तुमचें दीड वितीचें पोट ! त्याच्यासाठी तुम्ही आपलीं मस्तकें पायाखाली तुडविता. (एक दगड येतो व तो चितामणच्या डोक्याला लागतो.)

लोकांचे आवाज—कोणी मारला हा दगड, पकडा, पळडा त्याला. (कोलाहल)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चिंतामण-एका निष्पाप प्रामाणिक तरुणाला जगणें तुम्ही अशक्य करता ! काय नवल आहे बघा की, गावांतले सगळें पाप व दुष्टपणा एकत्र झाला आहे व एका पुण्यवान जिवाला सुखाने राहूं देत नाही. तिमिराने गोळा व्हावे व प्रकाशाला म्हणावे सूर्या तूं दूर हो, नाहीं तर तुला ग्रहण लावूं, असाच हा महामूर्खपणा आहे, (आणखी एक दगड येतो व चिंतामणच्या डोक्यांतून रक्त येतें)

पांडुरंग—चिंतामण, मित्रा, तुला खूप लागलें आहे, बैस खाली.

चिंतामण--(धीर गंभीर आवाजांत) लोकहो, मी माझें भाषण थांबवेन असें तुम्हाला वाटत असेल तर तुमची ती चूक आहे, मी तुम्हाला थंड म्हणतों तें उगाच नव्हे. माझा तुम्हाला बळी घ्यावयाचा असेल तर मी उत्सुक आहे, पण मरणाच्या भीतीने मी माझी भाषा मागे घेईन असें कधीहि होणार नाही !

एक तरुण-(पुढे येऊन) मग आम्ही काय करावे हें सांगा.

चिंतामण-मी काय सांगूं तुम्हाला ? एकादी वस्तू घरांत नको असेल तर तुम्ही काय करता ? शाळेंत तुम्हाला एकादा शिक्षक नको असेल तर काय करता ?

एक आवाज-शास्त्रीबुवा कुठे आहेत, ?

दुसरा आवाज-चला शास्त्रीबुवांच्या वाड्यावर !

चिंतामण-नाही, असें कांही करूं नका, त्याहून सोपा मार्ग आहे, देवासाठी फुलें कोण आणतो ?

एक आवाज-संतोबा माळी.

चिंतामण-त्याला सांगा फुलें आणूं नको. आरतीच्या वेळीं वाद्यें कोण वाजवतो ? त्या गुरवांना सांगा, वाजवूं नका, देवासाठी चंदन कोण करते ? त्या गिरजा कुणबिणीला सांगा नको करूं, आणि आरतींत पैसेहि टाकू नका, प्रसाद घेऊं नका, देवळांत जाऊं नका.

चिडलेले आवाज }—मोठा आला आहे सांगायला. (तिसरा दगड येतो व चिंतामण खाली पडतो.)

दुःखाचे आवाज-अरेरे ! पडला बिचारा.

पांडुरंग-चिंतामण, डोळे उघड, बघ माझ्याकडे !

भीतीचे आवाज--धावा, धावा, पोलीस.

पांडुरंग--चिंतामण, चिंतामण, बोल माझ्याशीं !

पतित मी पापी शरण आलों तुज ।
राखी माझी लाज पांडुरंगा ॥
तारियेले भक्त न कळे तुझा अंत ।
थोर मी पतित पांडुरंगा ॥
प्रल्हादा कारणें स्तंभी अवतार ।
माझा का विसर पांडुरंगा ।:
तुका म्हणे तुज शरण जीवेभावें ।
राखी माझी लाज पांडुरंगा ॥

लोकांचे आवाज--पोलीस आले, पळा, धावा, पोलीस आले.

शास्त्रीबुवा--(आंतून बाहेर धावत येत) अरे खंडोबा, खंडोबा, गदाधर कुठे आहे ! त्याच्याजवळ मी संमतिपत्र दिलें आहे. अरे त्याला शोध लवकर. (कावराबावरा इकडेतिकडे पळत आंत जातो.)

अनेक आवाज--अरे, हाच तो शास्त्रीबुवा. (पोलीस येतात, कांही लोकांना पकडतात व पांडुरंग, चिंतामण यांना "चला" म्हणतात.)

(१३)

(रस्ता, डाव्या हाताला सारजेचा वाडा, वर गच्चीवर सारजा, कौसल्या, सख्या व गदाधर उभे आहेत. वेळ संध्याकाळ.)

गदाधर--ते बघ पांडुरंग व चिंतामण पोलीसांच्या पहाऱ्यांत, (सारजेच्या कानांत) तूं अजून कबूल हो. मी त्यांना सोडवतो.

चिंतामण--(गातो)

हल्ला करणें तर दंभावर--तर बंडावर
शूरांनो । या, त्वरा करा रे ।
समतेचा ध्वज उंच धरा रे
वीरांनो । तरै पुढे सरा रे ।
आवेशानें गर्जत हरहर ।

कौसल्या--माझा बाळ, पांडुरंग. अरे थांब मी आले (धावत जाते).

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सख्या—बघा सारजाबाई, दोघांनाहि पोलीस नेत आहेत, चितामणचा सदरा रक्ताने भरला आहे.

गदाधर—तुझ्या हट्टामुळें दोन तरुणांची विटंबना होत आहे. सारजे, तूं बोलत का नाहीस ? हा क्षण एकदा गेला की...

चिंतामण—समतेचा ध्वज उंच धरा रे।
वीरांनो तर पुढे सरा रे।
आवेशाने गर्जत हरहर ॥

सारजा—नाही, मी माझा आत्मा विकणार नाही. नेऊं देत त्यांना, मी माझें शरीर देऊन त्यांना सोडविलें तर त्यांच्या सत्याग्रहाचें मोल कमी होईल.

कौसल्या—(पुन्हा धावत येत) बघ सारजाबाई, माझा मुलगा गेला. (खाली पडते)

गदाधर—सारजे, तुला कांही दयामाया ?

पांडुरंग—
हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥

सारजा—नाही, मी माझ्या शरीराची किंमत देणार नाही. मी तसें केलें तर त्यांच्या पुण्यव्रताला कलंक लागेल.

चिंतामण—पांडुरंग, ती बघ सारजाबाई वर उभी आहे व तुला नमस्कार करत आहे.

सारजा—(पुटपुटते) समतेचा ध्वज उंच धरारे।
हल्ला करणें तर दंभावर—तर बंडावर ॥

चिंतामण—(पुन्हा गातो)

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर तुंबळ संग्रामाला करिती ।
सम्प्रति दानव फार माजती देवावर झेंडा मिरविती ।
देवांच्या मदतीस चला तर ॥१॥

सारजा—(पुटपुटते) देवांच्या मदतीस चला तर ।

(दुरून वाऱ्यावर चिंतामणचा आवाज येतो.)

संप्रति दानव फार माजती ।
देवावर झेंडा मिरविती ।
देवांच्या मदतीस चला तर ॥

(शेवटची ओळ दोनदां ऐकूं येते.)

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी मराठी-भाषा-प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

१९५४–५५ सालासाठी वि. सा. संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळ

श्री. ह. ना. नेने हे १९५४–५५ सालच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचें संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी दि. ३० जानेवारी १९५४ रोजीं जाहीर केलें.

१९५४–५५ सालाकरिता वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दि. ६ मार्च १९५४ रोजीं होऊन, खालील सोळा उमेदवार कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून निवडून आल्याचें संघाध्यक्षांनी जाहीर केलें.

(१) प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे. (२) प्रा. पां. कृ. सावळापूरकर. (३) श्री. ना. रा. शेंडे (४) श्री. पां. बा. गडकरी. (५) प्रा. वा. कृ. चोरघडे. (६) श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे. (७) श्री. द. रा. गोमकाळे. (८) श्री. वसंत बाळाजी शब्दे. (९) श्री. केशव केळकर. (१०) श्री. रा. पु. सगदेव. (११) श्री. ल. वि. पांढरीपांडे. (१२) प्रा. गणेश त्र्यंबक देशपांडे. (१३) श्री. त्र्यं. द. देशमुख, पारवेकर. (१४) श्री. य. शं. धर्माधिकारी. (१५) श्री. तु. ना. काटकर. (१६) प्रा. श्री. ना. बनहट्टी.

नवीन अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांनी घटना नियम ११ (अ) प्रमाणे प्रा. भ. श्री. पंडित व श्री. पु. य. देशपांडे यांना १९५४–५५ सालाकरिता कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून नियुक्त केलें.

जुन्या कार्यकरी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या जुन्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. २१–३–५४ रोजीं सकाळीं ८ वा. प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरून, खालीलप्रमाणे कामकाज झालें.

१. दि. २५–१२–५३ रोजीं खामगाव येथे भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविण्यांत आला व तो मंजूर झाला.

२. सरचिटणिसांनी १९५३–५४ सालच्या कार्याचें संक्षिप्त प्रतिवृत्त सभेला सादर केलें.

३. वि. सा. संघाचें येतें १७ वें संमेलन अचलपूर कॅंप (परतवाडा) येथे भरविण्यासंबंधी तेथील सार्वजनिक वाचनालयातर्फे श्री. श्री. शा. गुप्ते यांनी दिलेलें निमंत्रण–पत्र सभेच्या विचारार्थ ठेवण्यांत आलें. डॉ. वि. भि. कोलते यांनी याचा विचार जुन्या व नव्या का. का. मंडळाच्या संयुक्त सभेंत करावा असें सुचविलें व तें मान्य झालें.

४. मध्यप्रदेश शासन, भाषा विभाग यांचेकडून आलेलें प्रादेशिक पुस्तकालयासंबंधीचें पत्र सभेच्या विचारार्थ ठेवण्यांत आलें. जुन्या व नव्या का. का. मंडळाच्या संयुक्त सभेने एक समिति नेमून तिला योजना आखण्याचा आदेश द्यावा, असें ठरलें.

५. नंतर, सरचिटणिसांनी फेब्रुवारी १९५४ अखेरपर्यंतचा जमा-खर्चाचा हिशेब सभेला सादर केला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

६. १९५४–५५ सालचें अंदाजपत्रक सभेच्या विचारार्थ ठेवण्यांत आलें. तें नवीन का० का. मंडळापुढे ठेवावें, असें ठरलें.

७. "यंदाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सरचिटणीस यांनी बहुमोल काम केलें याबद्दल ही सभा त्यांचे आभार मानते" असा ठराव प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी मांडला. त्यास श्री. द. शं. फडके यांनी अनुमोदन दिल्यावर तो मंजूर झाला.

त्यानंतर, अध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी सर्वांचे आभार मानल्यावर ही सभा संपली.

जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा

जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. २१-३-५४ रोजीं सकाळीं ९-३० वा. केन्द्रीय कार्यालयांत भरली. तींत जुन्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी नवीन अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांना अधिकारप्रदान केलें. श्री. ह. ना. नेने यांनी अधिकारग्रहण केल्यावर त्यांचे अध्यक्षतेखाली सभेचें कामकाज सुरू झालें.

प्रथम अध्यक्षांनी घटना नियम ११ (अ) प्रमाणें प्रा. भ. श्री. पंडित व श्री. पु. य. देशपांडे यांना कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून नियुक्त केल्याचें सांगितलें. त्यानंतर, घटना नियम ११ (अ) प्रमाणें पदाधिकाऱ्यांची निवडणूक होऊन खालील पदाधिकारी अविरोध निवडून आले.

उपाध्यक्ष : श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे.
सरचिटणीस : श्री. ना. रा. शेंडे.
चिटणीस : (१) श्री. ल. वि. पांढरीपांडे [नागपूर]
(२) श्री. वसंत बाळाजी शब्दे [भंडारा]
(३) श्री. तु. ना. काटकर [चांदा]
कोषाध्यक्ष : प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे
संपादक, 'युगवाणी' : श्री. पु. य. देशपांडे
संचालक, 'परीक्षा-समिति : प्रा. पां. कृ. सावळापूरकर

त्यानंतर, समित्या व उपसमित्यांची निवड करण्यांत आली.

निविदा समिति : अध्यक्ष—श्री. ह. ना. नेने [अधिकारपरत्वें]; आमंत्रक—श्री. ल. वि. पांढरीपांडे; सभासद—श्री. पु. य. देशपांडे व प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति : आमंत्रक—श्री. केशव केळकर; सभासद—श्री. ल. वि. पांढरीपांडे, सौ. प्रभावतीबाई पुरोहित, श्री. म. ता. सावजी, श्री. ना. हि. सोनडुले व श्री. य. शं. धर्माधिकारी.

पुस्तकालय समिति : अध्यक्ष—श्री. ह. ना. नेने [अधिकारपरत्वें]; कार्यवाह—श्री. ल. वि. पांढरीपांडे; सभासद—डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. ग. नी. भवाळकर, श्री. शं. वा. फलटणकर व श्री. पी. एस. फडके (विद्यापीठ वाचनालय).

प्रकाशन समिति : अध्यक्ष-श्री. ह. ना. नेने (अधिकारपरत्वें); आमंत्रक-श्री. ल. वि. पांढरीपांडे; सभासद-प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. शं. दा. पेंडसे, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. पु. य. देशपांडे व श्री. केशव केळकर.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शुद्धलेखन समिति : आमंत्रक-डॉ. शं. दा. पेंडसे; सभासद-डॉ. वि. भि. कोलते, डॉ. वा. ना. पंडित, डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. य. खु. देशपांडे व श्री. द. ह. अग्निहोत्री.

घटनाविषयक प्रश्न समिति : अध्यक्ष : रा. सा. खं. के. रांगोळे; आमंत्रक-श्री. ल. वि. पांढरीपांडे; सभासद-श्री. ए. श्री. पटवर्धन, प्रा. गो. मा. कुळकर्णी, श्री. ग. नी. भवाळकर, श्री. श. वा. रानडे, श्री. द. रा. गोमकाळे व श्री. ना. खं. तिरपुडे.

साहित्य संस्था सहकार समिति : आमंत्रक-प्रा. श्री. मा. कुळकर्णी; सभासद-प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. वि. ना. करवेलकर, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. दि. ब. पंडित, श्री. पु. व्यं. दारव्हेकर व प्रा. या. मु. पाठक.

परिभाषा समिति : आमंत्रक-डॉ. वि. भि. कोलते; सभासद-प्रा. भ. श्री. पंडित, श्री. श्री. स. पेंढारकर, डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. ग. त्र्यं. देशपांडे.

सीमा समिति : आमंत्रक-श्री. ए. श्री. पटवर्धन; सभासद-श्री. पु. य. देशपांडे, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, श्री. ना. ग. डवीर व श्री. तु. ना. काटकर.

युगवाणीचें संपादक मंडळ : संपादक—श्री. पु. य. देशपांडे, संपादक मंडळावरील सदस्य— प्रा. के. ज. पुरोहित, श्री. गो. रा. दोडके, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे.

परीक्षा-समिति : संचालक—प्रा. पां. कृ. सावळापूरकर; कार्यवाह—श्री. माणिक के. वैतुले; सभासद—डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. वसंत बाळाजी शब्दे, श्री. तु. ना. काटकर, श्री. द. शं. फडके, सौ. उषाताई कोलते, प्रा. दा. ल. अडोणी व श्री. दि. ब. पंडित.

गडकरी स्मारक समिति, मंदिर रचना समिति व मंदिरनिधि समिति यांचा विचार मंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर करण्यांत येईल; सध्या या समित्या आहेत तशाच कायम राहतील असें ठरलें.

कोणत्याहि समितीवर किंवा उपसमितीवर अधिक सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार त्या त्या समितीला राहील, तसेंच एखादी जागा कमी झाल्यास ती भरून काढण्याचा अधिकारहि त्या समितीला राहील, असें ठरलें.

सर्व समित्यांवर अध्यक्ष व त्यांच्या अनुपस्थितींत उपाध्यक्ष, तसेंच सरचिटणीस व त्यांच्या अनुपस्थितींत नागपूरचे चिटणीस अधिकारपरत्वें राहतील, असा निर्णय घेण्यांत आला.

प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाच्या राजीनाम्याचें दि. ८-३-५४ चें पत्र सभेपुढे विचारार्थ ठेवण्यांत आलें. त्यावर विचार होऊन, श्री. पु. य. देशपांडे यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. द. रा. गोमकाळे यांनी दुजोरा दिला.

ठराव—"प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाचा आपला राजीनामा परत घ्यावा, अशी कार्यकारी मंडळ त्यांना आग्रहाची विनंती करतें."

ठराव एकमताने मंजूर झाला.

त्यानंतर, अध्यक्षांनी मंदिर उद्घाटनासंबंधीचें निवेदन करून, या समारंभासाठी साधारणतः येणाऱ्या १५०० रु. च्या खर्चास मंजुरी मागितली; व सभेने मंजुरी दिली.

नंतर, सरचिटणिसांनी १९५४-५५ सालचें अंदाजपत्रक सभेला सादर केलें. त्यास तात्पुरती मान्यता देण्यांत आली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शासन, भाषा विभाग यांचेकडून आलेल्या प्रादेशिक पुस्तकालयासंबंधीच्या पत्राचा विचार होऊन, वाचनालय समितीने एक योजना आखावी, असें ठरलें.

अचलपूर कँप (परतवाडा) येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे वि. सा. संघाचें येतें १७ वें संमेलन भरविण्यासंबंधी देण्यांत आलेल्या निमंत्रणाचा विचार पुढील कार्यकारी मंडळाच्या सभेंत करण्याचें ठरलें.

* *

निवडणुकीसंबंधी लवादाचा निकाल

१९५४–५५ सालच्या निवडणुकी बेकायदेशीर झाल्याबद्दल दिग्रसचे श्री. कृ. वि. देशपांडे व अमरावतीचे श्री. शं. ना. सहस्त्रबुद्धे यांनी लवादाकडे तक्रारी केल्या होत्या. श्री. ए. श्री. पटवर्धन, लवाद, वि. सा. संघ यांनी चौकशी करून, अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांची निवडणूक कायदेशीर रीत्याच झाल्याचा निकाल दिला.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम समिति : वि. स. खांडेकर यांचीं व्याख्यानें

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीने मागील वर्षाप्रमाणेच यंदाहि दि. २६, २७, २८, ३० व ३१ जानेवारी १९५४ रोजीं तिकीट प्रवेशाने व्याख्यानमाला घडविली. गेल्या वर्षी नामांकित कादंबरीकार प्रा. ना. सी. फडके यांनी किर्लोस्कर, देवल, गडकरी, खाडिलकर व अत्रे या पांच प्रख्यात नाटककारांच्या नाटकांचा परामर्श घेतला होता. यंदा ख्यातनाम कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर यांनी ह. ना. आपटे, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके व साने गुरुजी या पांच अग्रगण्य कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा परामर्श घेऊन श्रोत्यांना अक्षरशः डोलविलें. तिकिट–विक्रीने व्याख्यानें घडवून आणण्याचा जो पायंडा वि. सा. संघाने मागील वर्षी घातला तो रूढ होत असल्याचा व कमालीचें यश प्राप्त होत असल्याचा प्रत्यय श्रोत्यांच्या अलोट गर्दीवरून या वर्षींहि आला.

* *

वि. सा. संघाला भेटी आणि भाषणें

दि. ८–२–५४ रोजीं 'नटनाट्य दर्शन, पुणें' या नाट्यसंस्थेच्या कलाकारांनी वि. सा. संघाला भेट दिली तेव्हा गडकरी स्मारक समितीतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला.

दि. २४–२–५४ रोजीं ह. भ. प. प्रा. सोनोपंत दांडेकर यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्यावेळीं त्यांचें 'ज्ञानेश्वरी'वर मोठें उद्बोधक भाषण झालें.

दि. २५–२–५४ रोजीं ख्यातनाम नाटककार श्री. भा. वि. उर्फ मामासाहेब वरेरकर यांनी वि. सा संघाला भेट दिली. त्यावेळीं त्यांचें भाषण होऊन, त्यांनी मराठी लेखकांना केवळ लेखनव्यवसायावर जमणें किती दुष्कर आहे याचें हृदयस्पर्शी चित्र रेखाटलें.

दि. १५–३–५४ रोजीं भारतीय षड्दर्शनांचे दीर्घ व्यासंगी पंडित बाळकृष्णशास्त्री खुपेरकर यांचें 'ज्ञानेश्वरीचें तत्त्वज्ञान' या विषयावर विचारप्रवर्तक भाषण झालें.

दि. २२–३–५४ रोजीं मध्यप्रदेशाचे अन्नमंत्री श्री. दीनदयाल गुप्ता, स्वास्थ्यमंत्री श्री. मा. सा. कन्नमवार व राजस्व उपमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी वि. सा. संघाला भेट दिली व मंदिराचें बांधकाम पाहून समाधान व्यक्त केलें. त्याचप्रमाणे दि. २५–३–५४ रोजीं मध्यप्रदेशाचे अर्थमंत्री व म. प्र. हिंदी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य संमेलनाचें अध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी यांनी वि. सा. संघाला भेट देऊन मंदिराच्या बांधकामाची पाहाणी केली व समाधान व्यक्त केलें.

* *

१६ नोव्हेंबर १९५३ पासून ३१ मार्च १९५४ पर्यंत विदर्भ साहित्य मंदिरनिधीस आलेल्या देणग्या

श्री. रा. रा. ट्रस्टी, टिळक पर्स फंड, पुणें	रु. २०००	श्री. महेश्वर जनार्दन गद्रे	रु. ५१
श्रीमंत गणपतराव बुटी	रु. ५००	श्री. नागेश चिंतामण जोशी	रु. १०
श्रीमंत भास्करराव बुटी	रु. ४००	श्री. नारायण रामचंद्र तत्ववादी	रु. १०
श्री. माधव रामकृष्ण जोशी	रु. १००	श्री. मधुसूदन सदाशिव पुराणिक	रु. १०
श्री. व्यंकटेश विनायक कोठेकर	रु. ५१	सौ. मनोरमाबाई करंदीकर	रु. ५

गडकरीस्मारक समिति : मंदिरनिधीस देणग्या

श्री. बाबूरावजी गोरे, नटनाट्य दर्शन, पुणें	रु. ५१८-८	सौ. इंदुमतीबाई केळकर	रु. १०
		श्रीमती शांताबाई जोगळेकर	रु. १०
श्रीमती कमलिनीबाई पिंपळे	रु. १०१	श्री. पी. के. मोदी	रु. १०
श्रीमती गंगाबाई गोखले	रु. १०१	डॉ. हिरालाल जैन	रु. ५
सौ. लक्ष्मीबाई देशमुख	रु. ५१	सौ. प्रमिलाबाई बेहेरे	रु. ५
श्री. यशवंतराव कुळकर्णी	रु. ५१	कु. शांताबाई जैन	रु. ५
डॉ. सौ. येरगांवकर	रु. २६	डॉ. डी. जी. लोंढे	रु. ५
श्री. परमानंद भिशीकर	रु. २५	प्रा. या. मु. पाठक	रु. ५
श्री. अनंतराव धोंडो मांडे	रु. २५	श्री. द. ग. गुप्ते	रु. ५
श्री. मनोहरपंत बुळे	रु. २५	सौ. उमाबाई फडणीस	रु. ५
श्रीमती कुसुम यशवंतराव मराठे	रु. २५	श्री. तात्याजी फडणीस	रु. ५
शिक्षक वर्ग, भिडे कन्या शाळा	रु. २१	सौ. सुमित्राबाई कुळकर्णी	रु. ५
सौ. विमलाबाई वझलवार	रु. १५	सौ. मनोरमाबाई कानेटकर	रु. ५
सौ. प्रमिलाबाई दाणी	रु. १५	श्रीमती सरस्वतीबाई पटवर्धन	रु. ५
श्री. विठ्ठलराव वैरागडे	रु. १०	श्री. अनंतराव वि. पटवर्धन	रु. ५

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक : **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे**

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य : : सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

हें मासिक श्री. **पां. ना. बनहट्टी** यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. **ना. रा. शेंडे**, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ